CMYK


## पाहिजेत
जिल्ह्यातील संपूर्ण तालुका ठिकाणी तालुका प्रतिनिधी व होम सर्वेअर तसेच तालुका व्यवस्थापक नियुक्त करणे आहे.
प्रोजेक्ट पिएम सुर्यघर योजना
मासिक वेतन 15000/- + इनसेटीव्ह
अधिक माहिती करिता संपर्क साधावा
Mob.9767878783
16531-13658


# पार्श्वभूमी


## रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818


गंमत भंडारी
बीड वर्ष ३६ वे अंक ६७ वा फोन २३०१०१ दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ बुधवार ई-पेपर : www.parshvbhumi.com Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 पाने ६ किंमत ४रु.

## कितीही पैसे खाल्ले तरी आमचे काही बिघडत नाही म्हणणाऱ्या अधिकाऱ्यांना हिसका

# शेतकऱ्यांच्या अतिवृष्टीत २५ कोटी रुपये खाल्ले
# २२ तलाठी, ५ महसुल अधिकाऱ्यांना ठोकल्या बेड्या

बीड दि. ३ (प्रतिनिधी):- कितीही पैसे खाल्ले तरी अधिकाऱ्यांचा काहीही बिघडत नाही अशा अविर्भावात तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिलदार, वरीष्ठ महसुल अधिकारी वावरत असतात. मात्र जालन्यात २५ कोटी रुपयांचे अतिवृष्टीचे अनुदान घोटाळ्या प्रकरणी २२ तलाठी, ५ महसुल अधिकाऱ्यांसह ३१ जणांना बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईने सर्वत्र खळबळ माजली आहे. या तलाठी महाशयांनी अतिवृष्टीच्या अनुदानाखाली तब्बल २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८८१ रुपयांचा डल्ला मारला आहे. टप्प्याटप्प्याने यांना अटक करण्यात आली असून काहींना जामीनही झाला आहे. मात्र या कारवाईचे सामान्य जनतेकडून स्वागत होत आहे.



जालना जिल्ह्यात एक मोठा घोटाळा समोर आला असून या घोटाळ्यावर जिल्हा प्रशासनाने केलेल्या कारवाईमुळे सर्वच भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी हादरले आहेत. २५ कोटींच्या अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यात ३१ आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. या प्रकरणात या सरकारी कर्मचारी, अधिकाऱ्यांनी शेतकरी बनून सरकारच्या तिजोरीवर डल्ला मारला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अतिवृष्टी अनुदानाच्या नावाखाली तब्बल २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८४१ रुपयांचा डल्ला मारणाऱ्या ३१ आरोपींना जालना आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली असून यात २२ तलाठी, ५ अधिकारी, तहसिल कर्मचारी, संगणक तज्ञ यांचा समावेश आहे.

### बोगस शेतकरी दाखवून स्वत:च पैसे उचलले

केंद्र आणि राज्य सरकारकडून शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. अशीच एक योजना म्हणजे अतिवृष्टी झाल्यानंतर आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान देण्याची शासनाची योजना असते. परंतु या योजनेतही तलाठ्यांनी हात साफ केले आहेत. बोगस शेतकरी दाखवून स्वत:च पैसे उचलल्याचा प्रकार समोर आला. या प्रकरणात पोलिसांनी सविस्तर चौकशी करुन कशा पद्धतीने हा घोटाळा केला हे उघडकीस आणले असून ही मोठी कारवाई पोलिसांनी केली आहे. आणखी या प्रकरणात बरेच अधिकारी अडकले असल्याची चर्चा असून त्यांच्यावरही कारवाई होण्याची शक्यता आहे. शासनाच्या विविध योजनांमध्ये शेतकरी, गरीब,वंचित, कष्टकरी यांच्यासाठी विविध स्वरुपाचे अनुदान येत असते. मात्र या अनुदानावर भ्रष्ट अधिकाऱ्यांची कायमची नजर असते. आपण काहीही केले तरी आपले काही वाकडे होऊ शकत नाही अशी मानसिकता त्यांची असते, ते कोणाला ऐकत नाहीत. मात्र या कारवाईने सर्वत्र खळबळ माजली असून आणखी बडे मासे हाती लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### तुम्ही तरी कुठे नियमानुसार वाळू वाहतुक करता? -जिल्हाधिकारी

# वाळू टेंडर मालकांची तक्रार करण्यासाठी गेलेल्या टिप्परवाल्यांवर लाखो रुपयांच्या दंडाचा बोजा टाकणार

बीड दि.३ (प्रतिनिधी):- वाळू टेंडर धारकांकडून सुरु असलेल्या कथित मनमानी कारभाराविरुद्ध आक्रमक होत टिप्पर संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन तक्रार केली. मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी टिप्परवाल्यांचीच उलट तपासणी करत तुम्ही तरी कुठे नियमानुसार वाळू वाहतुक करतात? असे म्हणत त्यांच्याकडे तीन-तीन चार-चार टिप्पर आहेत. जे एका इनव्हाईसवर चार ते पाच फेऱ्या करतात त्यांच्या टिप्परवर लाखो रुपयांच्या दंडाचा बोजा टाकण्यात येणार आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी पाडळशिंगी टोलनाक्यावरील सीसी टीव्ही फुटेज तपासण्याचे आदेशही दिल्याचे सुत्रांनी सांगितले. या प्रकारामुळे टिप्परवाल्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी टिप्परवाल्यांना चांगलाच दणका दिला असून यापुढे आता प्रत्येक वाळुच्या गाड्यांवर प्रशासनाची करडी नजर राहणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

जिल्हाधिकाऱ्यांनी वाळू टेंडर मालकांच्या मनमानी कारभाराला लगाम घालून त्यामध्ये हस्तक्षेप करावा अशी मागणी टिप्पर संघटनेकडून करण्यात येत आहे. याच मागणीसाठी टिप्पर मालक संघटनेच्या नेतृत्वाखाली टिप्परवाल्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याकडे वाळू टेंडर मालकांची तक्रार केली. ८० हजार रुपयांच्या एका पावतीवर २४ तासाच एक वैध आणि दोन अवैध वाळुच्या खेपा दिल्या जात आहेत असा अलिखीत नियम बीड जिल्ह्यात सुरु असल्याचे संघटनेचे म्हणने होते. इतर जिल्ह्यात प्रत्येक ट्रीपसाठी स्वतंत्र पावती दिली जाते, मग बीडमध्ये वेगळा नियम का? असा सवाल देखील टिप्पर मालकांनी उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट

पान २ वर

### टिप्पर सुद्धा ब्लॅकलिस्ट करणार

टिप्पर चालकांकडून वाळू वाहतुक करतांना प्रशासनाची आणि टेंडर मालकाचीही दिशाभूल केली जात असल्याचे सांगण्यात येते. एका इनव्हाईसवर चार ते पाच टिप्परच्या फेऱ्या केल्या जातात. इनव्हाईस काढले जाते कोल्हापूरचे आणि वाळू टाकली जाते जिल्ह्यातच असे प्रकार देखील समोर आले आहेत. एका इनव्हाईसवर तीन फेऱ्या त्याही प्रत्येकी तीन ब्रास वाळू प्रमाणे करता येतात, मात्र टिप्परवाले त्याही पुढे जाऊन तीन ऐवजी प्रत्येकी सहा ब्रास वाळू वाहतुक करुन फेऱ्या देखील जास्तीच्या करतात असे सांगितले जाते. त्यामुळेच जिल्हाधिकाऱ्यांनी पाडळशिंगी टोलनाक्यावरील सीसी टीव्ही फुटेज तपासून इनव्हाईसच्या अनुषंगाने जास्तीच्या फेऱ्या आढळून आल्यास संबंधीत टिप्पर ब्लॅकलिस्ट करुन त्याच्यावर दंडाचा बोजा टाकण्याचा निर्णय घेतल्याचे सुत्रांनी सांगितले.

### मागील बोगस बिले काढण्यासाठी दबाव

# बीड न.प.च्या मुख्याधिकारी फडसेंचा कंटाळून बदलीसाठी शासनाकडे अर्ज



बीड दि.३ (प्रतिनिधी):- कोट्यावधी रुपयांची मागील काळातील बिले काढण्यासाठी बीड नगर पालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्यावर दबावतंत्राचा वापर काही विद्यमान नगर सेवकांकडून केला जात आहे. या सर्व कटकटीला कंटाळून मुख्याधिकारी फडसे यांनी शासनाकडे बदलीसाठी अर्ज केला असून या अर्जाला नांदेडचे खा.अशोक चव्हाण यांचे शिफारसपत्र लावण्यात आले आहे. शैलेश फडसे हे अत्यंत प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी आहेत. नियमांची चौकट तोडून ते कधीच काम करत नाहीत, अशा चांगल्या अधिकाऱ्याची बीडमध्ये गरज आहे. बीड नगर पालिकेत निवडूण आलेल्या सर्व नूतन नगर सेवकांनी अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला बीडमधून जाऊ नये यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

बीड नगर पालिकेमध्ये मागच्या काळात बांधकाम विभागातील अभियंता यांनी अनेक नगर सेवकांना खूश करण्यासाठी व आपल्या विरोधात कोणी बोलू नये यासाठी एक-एक, दोन-दोन फाईली तयार करुन दिल्या. ही कामे प्रत्यक्षात झालेली नाहीत. बोगस बिले उचलायचा प्रयत्न सुरु आहे. मात्र मागच्या काळातील या जुन्या फाईलीवर स्वाक्षरी करण्यासाठी विद्यमान मुख्याधिकाऱ्यांनी स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांवर काही विद्यमान नगर सेवकांकडून दबावतंत्राचा वापर सुरु असल्याची चर्चा आहे. या सर्व कटकटीला कंटाळून काही महिन्यापुर्वीच बीडमध्ये रुजू झालेले मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी शासनाकडे बीडमधून इतरत्र बदली करावी असा अर्ज केला आहे. फडसेंसारखे कर्तव्यदक्ष व नियमात चालणारे अधिकारी बीडमध्ये राहणे

पान २ वर



### बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी सुनेत्राताई पवार

# स्व.अजितदादांनी पाहिलेलं बीडच्या विकासाचं स्वप्न आता सुनेत्राताई पूर्ण करणार

बीड (प्रतिनिधी) - राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती करण्यात आली आहे. सुनेत्राताईंकडे बीडसह पुण्याचीही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने आज काढला. दरम्यान पालकमंत्री म्हणून अजितदादांनी बीडकरांना विकासाचा वादा केला होता. मात्र त्यांच्या अकाली निधनाने बीड जिल्हा पोरका झाल्याच्या भावना व्यक्त होत आहेत. त्यातच स्वत: ना.सुनेत्राताईंनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्विकारल्याने दादांनी पाहिलेले विकासाचे स्वप्न आता सुनेत्राताई सक्षम पालकमंत्री म्हणून नक्कीच पुर्ण करतील अशी अपेक्षा जिल्हाभरातून व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने मंगळवारी दुपारी बीड आणि पुण्याच्या पालकमंत्र्यांच्या नावाची घोषणा केली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाल्याने बीड आणि पुण्याचे पालकमंत्री पद रिक्त झाले होते. त्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची बीड आणि पुण्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती करण्यात आली आहे. सुनेत्राताईंच्या नियुक्तीने बीड जिल्हा वासियांच्या अपेक्षा

पान २ वर

# कामे न करताच बोगस बिले उचलली

### नांदूर हवेलीत रोहयोत गैरव्यवहार झाल्याची तक्रार



बीड दि.३ (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील नांदूरहवेली ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमीच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची तक्रार शेख आमिर शेख अहमद आणि शेख निसार शेख गुलाब यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे. कामे न करताच बोगस बिले उचलण्यात आली असून संबंधीत अभियंता, ग्रामसेवक, सरपंच, रोजगार सेवक व ऑपरेटर यांच्या संगनमताने ही सर्व बोगस बिले उचलण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना शेख आमिर व शेख निसार यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मग्रारोहयो अंतर्गत

पान २ वर

### मांजरसुंबा घाटात धावत्या कारने पेट घेतला



बीड दि.३ (प्रतिनिधी):- मांजरसुंबा घाटात धावत्या कारने पेट घेतल्याची घटना मंगळवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली. गाडीतील सर्व जण वेळीच बाहेर निघाल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र या आगीत इर्टिगा कार जळून खाक झाली आहे.
बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील घाटात अचानक एका इर्टिगा कारने पेट घेतला. धावत्या कारने पेट घेतल्याने एकच खळबळ उडाली. गाडीतील सर्वजण वेळीच बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली.

पान २ वर

# वन विभागाच्या नाकावर टिच्चून वृक्षतोड करुन लाकडाची वाहतुक

### जिल्हाधिकाऱ्यांना सर्व पुरावे देणार -पिंगळे



बीड दि.३ (प्रतिनिधी):- वन विभागाच्या नाकावर टिच्चून बीड शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड करुन लाकडाची वाहतुक केली जात असल्याचे समोर आले आहे. वन विभागाला सांगुनही या प्रकरणात कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्व पुराव्यांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करणार असल्याचे सुशील पिंगळे यांनी म्हटले आहे.
बीड शहर आणि परिसरात अवैध वृक्षतोड करुन वाहनांमधून सर्रास लाकडांची वाहतुक केली जात आहे. काही वाहने वन विभागाच्या कार्यालयासमोरुन ये-जा करतात तरीही अधिकारी मात्र कसलीच कारवाई करत नाहीत. यापुर्वी वन विभागाकडे

पान २ वर

# २६५ जातीच्या उसाची नोंद घ्या, अन्यथा आंदोलन -गंगाभिषण (भाई) थावरे

बीड दि.३ (प्रतिनिधी):- यंदा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात नवीन ऊस जातींची लागवड केली आहे. मात्र अतिवृष्टी, रोगराई तसेच हुमणीसारख्या किडींच्या प्रादुर्भावामुळे ऊस उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. अनेक जातींमध्ये अपेक्षित उतारा न आल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.
दरम्यान, २६५ जातीचा ऊस हा रोगप्रतिबंधक असून प्राणी तो खात नाहीत, मनुष्यालाही सोलण्यासाठी जड जातो. तसेच या जातीला पाण्याची गरज तुलनेने कमी असल्याने तो शेतकऱ्यांसाठी अधिक परवडणारा आहे. असे असतानाही साखर कारखाने २६५ जातीच्या उसाची नोंद घेत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. २६५ जातीच्या

पान २ वर



# ॲड.व्ही.डी.साळुंके यांना पाचव्यांदा निवडूण देण्याचे आवाहन



माजलगाव दि.३ (प्रतिनिधी):- महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराच्या निमीत्त तालुक्याचे भूमीपुत्र आणि औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठातील यशस्वी विधिज्ञ वसंतराव साळुंके यांनी माजलगाव वकील संघाला भेट देऊन बार कौन्सिलच्या त्यांच्या चतुर्थ सदस्य पदाच्या टर्ममध्ये बार कौन्सिल मार्फत सुरु झालेल्या नेत्रदिपक कामगिरीची यशस्वी पूर्तता करण्यासाठी पहिल्या पसंतीचे मत देऊन भरघोस मतांनी विजयी करत बार कौन्सिलवर पाठविण्याचे आवाहन वकील संघाला ॲड.साळुंके यांनी केले.

पान २ वर

### जिल्हा युवा सेनेच्या वतीने कर्करोग जनजागृती अभियान

बीड दि.३ (प्रतिनिधी):- खा.श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बीड जिल्हा युवा सेना व शिवसेना डॉक्टर सेलच्या वतीने बीड जिल्हा कर्करोग मुक्त ही संकल्पना जिल्ह्यात राबविण्याचा उपक्रम घेण्यात येणार असून ४ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता बीड शहरात शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम अजिंक्य मुळे

पान २ वर

CMYK

# माजलगावच्या जुन्या मोंढ्यातील दुकानदारांच्या अतिक्रमणाने तर मेन रोडवर हातगाड्यांचे व्यापारी, रस्त्यावरील पार्कींगच्या अतिक्रमणाचा कळस

माजलगाव दि.३ (प्रतिनिधी):- शहराचा वर्दळीचा आणि मुख्य भाग म्हणुन ओळख असलेल्या जुना मोंढ्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत तसेच जुनी हैद्राबाद बँक ते तातेड यांच्या घरापर्यंत व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते झेंडा चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक ते डॉ. कलाम चौक या अतिवर्दळीच्या मुख्य रस्त्यांवरील व्यापा-यांनी दुकानांचे सामान रस्त्यांवर दहा - दहा फुट लावत अतिक्रमणे थाटली आहेत तर हातगाड्यांचे व्यापारी, दुचाकी व चारचाकी वाहनांची पार्कींग यामुळे जिकडे तिकडे अतिक्रमणांच्या विळख्याने विद्यार्थ्यांना, पादचारी महिला, नागरिकांना जिव मुठीत धरून वावरावे लागत आहे तर या जिवघेण्या अतिक्रमणांकडे नगरपालिकेच्या नुतन नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, न. प. प्रशासन, पोलिस प्रशासन बघ्याची भुमिका घेत आहेत. हे अतिक्रमणे पक्षपातीप्रमाणे काढुन घेण्याची मागणी नागरिकांतुन होत आहे.

■ **पादचारी, नागरिकांना नाहक त्रास**

■ **जिव मुठीत धरून वावरावे लागते, न. प., पोलिस प्रशासनाची बघ्यांची भुमिका**

■ **शहरातील अतिक्रमणे हटविण्याची नागरिकांतुन होतेय मागणी**

माजलगाव शहर सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात पूर्णपणे अडकले असून याचा सर्वाधिक फटका विद्यार्थी वर्गाला बसत आहे. शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्ग परिसर, बस स्थानक व मुख्य रस्त्यांवर केलेल्या बेकायदेशीर अतिक्रमणांमुळे विद्यार्थ्यांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. मात्र या गंभीर प्रश्नाकडे नगरपरिषद व पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचे चित्र दिसत असून ही भूमिका नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण करणारी ठरत आहे. शहरातील प्रमुख चौक, फुटपाथ, रस्त्यांच्या कडेला हातगाड्या, टपऱ्या, अनधिकृत दुकाने, फेरीवाले यांचा सुळसुळाट झाला आहे. परिणामी रस्ते अरुंद झाले असून वाहतुकीची कोंडी नित्याची बाब बनली आहे. सकाळी शाळेला व दुपारी महाविद्यालयाला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना वाहनांच्या गर्दीतून, हॉर्नच्या कर्कश आवाजात, अपघाताच्या भीतीतून वाट काढावी लागत आहे. अनेक ठिकाणी फुटपाथच अतिक्रमणात गेल्याने विद्यार्थ्यांना थेट रस्त्यावरून चालावे लागत आहे. दुचाकी, चारचाकी, रिक्षा यांची वर्दळ, त्यातच बेकायदेशीर पार्किंग या सगळ्याचा ताण विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर थेट येत आहे. अपघात घडल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल पालक व नागरिक उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे नगरपरिषदेने अतिक्रमण हटाव मोहिमा केवळ कागदावरच राबवल्याचे चित्र आहे. एखाद-दुसऱ्या दिवशी कारवाईचा दिखावा होतो आणि काही तासांतच पुन्हा जैसे थे स्थिती निर्माण होते. पोलीस प्रशासन देखील वाहतूक नियमनाऐवजी मूक प्रेक्षकाची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना प्रशासनाची ही उदासीनता अत्यंत चीड आणणारी व निषेधार्ह आहे. शहर सुशोभीकरण, स्मार्ट सिटीचे गाजर दाखवणारे अधिकारी प्रत्यक्षात मात्र विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करत आहेत. आता तरी नगरपरिषद व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे ठोस आणि कायमस्वरूपी अतिक्रमण हटाव मोहीम राबवावी, शाळा-महाविद्यालय परिसर अतिक्रमणमुक्त करावा, वाहतूक शिस्त लावावी, अन्यथा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी नागरिकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, अशी स्पष्ट भूमिका माजलगावकर व्यक्त करत आहेत.

बीड दि.३ (प्रतिनिधी):- शहरात अनेक नळांना तोट्या नसल्याने पाण्याचा अपव्यय होत आहे. तरी नगर परिषदेने या बाबत विशेष मोहिम हाती घेऊन तोट्या नसलेल्या नळांवर प्रतिबंधात्मककारवाई करावी अशी मागणी होत आहे.

**परळी, माजलगावात ठेवीदारांच्या बैठका**

## २४ फेब्रुवारीच्या मुंबई मोर्चासाठी एकजूट - प्रा. सचिन उबाळे



बीड दि.३ (प्रतिनिधी):- बुडीत निघालेल्या ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, माँसाहेब जिजाऊ, सह इतर पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवी तात्काळ परत मिळाव्यात, जप्त केलेल्या मालमत्तांचा लिलाव करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी ठेवीदार आता थेट रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत. या पार्श्वभूमीवर रविवारी, सोमवार परळी व माजलगाव येथे ठेवीदारांच्या बैठका घेण्यात आल्या. मुंबईत होणाऱ्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा ठाम निर्धार यावेळी ठेवीदारांनी व्यक्त केला असल्याचे ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन भैय्या उबाळे यांनी सांगितले.

२४ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे ठेवीदारांचा भव्य मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चाच्या नियोजनासाठी तसेच ठेवीदारांमध्ये जागृती करण्यासाठी प्रा. उबाळे यांच्या उपस्थितीत मराठवाड्यात शाखानिहाय बैठका घेतल्या जात आहेत. परळी व माजलगाव येथील बैठकीत ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन भैय्या उबाळे यांनी मार्गदर्शन केले. बुडीत पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवीदारांचे पैसे तात्काळ मिळावेत, जप्त मालमत्तांचा लिलाव लवकरात लवकर करून ठेवीदारांना न्याय द्यावा, अशी ठाम भूमिका प्रा. उबाळे यांनी मांडली. प्रशासनाने दिरंगाई केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. बैठकीत ठेवीदारांनी एकजुटीने मुंबई मोर्चाला पाठिंबा देत आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

## रतनलाल परदेशी यांचे दु:खद निधन



बीड दि.३ (प्रतिनिधी):- छत्रपती संभाजी नगर येथील माजी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय अध्यक्ष रतनलाल परदेशी वय (८२) यांचे दिनांक ३ फेब्रुवारी रोजी दु:खद निधन झाले. त्यांचे अंत्यविधी आज दिनांक ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता राहते घर एकनाथ नगर येथून प्रताप नगर स्मशानभूमी येथे त्यांचा अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. परदेशी परिवार यांच्या पश्चात दोन मुलं चार मुली सुना नातवंडे असा परिवार आहे. परदेशी परिवाराच्या दु:खात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.


### मालमत्तेचे व्यवहार करताना तोतयांपासून सावधगिरी बाळगावी

मुंबई दि.३ (प्रतिनिधी) :- तोतया व्यक्तींना पुढे करून बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त नोंदणी करण्याचे प्रकार घडत असून, या पार्श्वभूमीवर जनसामान्यांनी मालमत्तेच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करतांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे सह जिल्हा निबंधक यांनी केले आहे.एका तोतया व्यक्तीने स्वतःला मूळ मालक म्हणून दर्शवत बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्तनोंदणी केल्याचा गंभीर प्रकार अंधेरी येथील सह दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात २९ जानेवारी रोजी उघडकीस आला आहे.

## नागेशवाडी येथे बिबट्याचा गाई वासरावर हल्ला

### माणूस किंवा जनावरे मेल्यावर भरपाई देण्याऐवजी बिबट्याचा बंदोबस्त करा - आप्पासाहेब थोरवे

डोंगरकिन्ही दि.३ (प्रतिनिधी):- पाटोदा तालुक्यातील पारनेर पासून जवळच असलेल्या नागेशवाडी येथे मारोती मंदीराजवळ भरवस्तीत असलेल्या जनावरांच्या गोठ्यात दि.२ फेब्रुवारी रोजी रात्री बिबट्याने केलेल्या हल्यात वासरु गंभीर जखमी झाले आहे. बिबट्याच्या हल्यात माणूस किंवा जनावरे मेल्यावर भरपाई देण्याऐवजी वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने आप्पासाहेब थोरवे यांनी केली आहे.



सविस्तर वृत्त असे की, पारनेर पासून जवळच डोंगरपट्ट्यात नागेशवाडी ही चारशे ते पाचशे लोकांची वस्ती आहे. गेल्या अनेक दिवसांपासून परीसरात बिबट्याचा वावर सुरु असल्याची माहिती वनविभागास दिली होती. बिबट्या पकडण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलण्याऐवजी एखादा कर्मचारी पाठवून लोकांची समजूत काढत आहेत. नागेश वाडी येथील शेतकरी श्री आप्पासाहेब थोरवे यांच्या वस्तीजवळ असलेल्या गोठ्यात गेल्या वर्षी बिबट्याने तीन शेळ्या मारल्या होत्या. त्याचीच पुनरावृत्ती करत बिबट्याने २ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास गोठ्यामध्ये गाई व वासरावर हल्ला केला होता यामध्ये वासरु गंभीर जखमी झाले आहे ते वाचण्याची शक्यता कमी असल्याचे डॉक्टर सांगतात. वासराच्या पोटाला चार टाके पडले असून मानेला व पायाला गंभीर जखमा आहेत. गोठ्यामध्ये ६ गाई १ म्हैस व ४ वासरे होते. जनावरांनी मोठा ओरडा केल्याने अधिक हानी टळली मात्र ग्रामस्थांमध्ये भयंकर भितीचे वातावरण पसरले आहे. दिवसा व रात्री शेतीकडे फिरणे अवघड झाले आहे. पशुवैद्यकीय अधिकारी यांची तात्काळ मदत मिळत नाही तेही टोलवाटोलवी करतात, तर वन अधिकारी म्हणतात काळजी करू नका वासरु मेल्यावर नुकसान भरपाई साठी क्लेम करु. बिबट्याच्या हल्यात माणूस किंवा जनावरे मेल्यावर भरपाई देण्याऐवजी वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने आप्पासाहेब थोरवे यांनी केली आहे.

पान ६ वरून

### बीडच्या पालकमंत्रीपदी सुनेत्राताई पवार

जाहीर करण्यात आली.या नियुक्तीचे स्वागत करताना आमदार सुरेश धस यांनी सुनेत्राताई पवार यांना शुभेच्छा दिल्या. स्व. अजितदादांप्रमाणेच ठाम भूमिका, निर्णयक्षमता आणि सर्वसामान्यांशी थेट संवाद ठेवणारे नेतृत्व सुनेत्राताईंकडे आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना आमदार धस यांनी अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनामुळे संपूर्ण राज्याचे अपूरणीय नुकसान झाले आहे, अशी भावना व्यक्त करत, त्यांच्या कार्याचा आणि नेतृत्वाचा वारसा सुनेत्राताई पवार समर्थपणे पुढे नेतील, अशी अपेक्षा देखील व्यक्त केली.

### भागवत भक्त पारायण नंदकुमार महाराज ज्ञान, भक्ती, वैराग्याचे मूर्तिमंत संत पुरुष

आहे. रामकथा ही भारताचा वैदिक संस्कृतीचा प्राण आहे. मंदिर, शास्त्र आणि संत या तीन परंपरा संस्कृतीचे आधारस्तंभ आहेत. श्रीनंदकुमार महाराज यांच्या एकसष्ठी निमित्त महामोपाध्याय प.पू. भद्रेशदास स्वामी (मुख्यआचार्य- स्वामीनारायण संस्था, दिल्ली) यांनी अशा शुभकामना आणि आशीर्वाद दिले आहेत. संस्कृतीची सेवा, वैदिक सनातनाची, भारत देशाची सेवा भागवत पुराण, राम कथेतून होत राहो ,असा शुभ संदेशरुपी आशीर्वाद ही त्यांनी दिला आहे .ह भ प विशाल महाराज कुलकर्णी (रामदासी) यांच्या मधुर वाणीतून संगीत राम कथेचे आयोजन बुधवार ४ फेब्रुवारी पासून कपिलमुनी मंदिर चऱ्हाटा रोड, अंकुश नगर, बीड येथे दररोज दुपारी तीन ते सहा या वेळेत होणार असून रविवार ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते १० राम कथा. दहा ते अकरा श्रीमहाराजांची तुला. त्यानंतर ह भ प कृष्णा महाराज रामदासी यांचे काल्याचे किर्तन अकरा ते एक या वेळेत होईल आणि त्यानंतर महाप्रसाद एक ते पाच दरम्यान होणार आहे. या ज्ञानभक्ती यज्ञ सोहळ्यात वे.मू. अमोलभट्ट जोशी ,सौरभ भट्ट काळे, अतुलभट्ट सीतापती, किरणभट्ट गोसावी हे चतुर्वेद पारायण करत आहेत. यज्ञ मार्तंड यज्ञेश्वर महाराज सेलुकर, ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर, पू.अमृत महाराज जोशी,साधू सुबोधसागर दास महाराज,पू.दिव्यनयन स्वामी महाराज (स्वामीनारायण संस्था नाशिक प्रमुख),श्री विनायक महाराज पाटांगणकर यांच्यासह अनेक साधुसंत महंत यांची उपस्थिती आणि आशीर्वाद या वेळी प्राप्त होत आहेत. रामदासी व शिष्य परिवाराच्या वतीने या श्री नंदकुमार महाराज यांच्या एकसष्टी निमित्ताने होत असलेल्या या महोत्सवात सहभागीहोत सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### चंपावती महोत्सवाच्या रांगोळी स्पर्धेतून शिवरायांचा इतिहास

रंग, रचना आणि सर्जनशीलतेच्या जोरावर बालकलाकारांनी आपल्या सुप्त कलागुणांना वाव देत अद्भुत असा कलाविष्कार सादर केला. चंपावती महोत्सवातील रांगोळीची ही दुसरी स्पर्धा सलग दुसऱ्या दिवशीही बालकलाकारांच्या प्रचंड प्रतिसादात पार पडली. प्रत्येक रांगोळीतून इतिहास, संस्कृती आणि बालमनातील कल्पनाशक्तीचे सुंदर दर्शन घडले.या उल्लेखनीय सहभागाबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी सर्व बालकलाकारांचे विशेष कौतुक करत त्यांचे आणि सहभागी सर्व शाळांचे अभिनंदन केले. तसेच बीड जिल्ह्यातील बालकलाकारांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळवून देणे, हेच आमचे ध्येय असल्याचे मत अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केले. दरम्यान, दि. ४ फेब्रुवारी ते दि. १० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नृत्य, नाट्य, संगीत अशा विविध सांस्कृतिक स्पर्धा बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत संपन्न होणार असल्याची माहिती अनिल दादा जगताप फाउंडेशनचे सचिव आकाश भैया जगताप आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कांबळे यांनी दिली.चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील बालकलाकारांना व्यासपीठ मिळत असून, सांस्कृतिक वारसा जपण्याची आणि पुढील पिढी घडवण्याची ही चळवळ अधिक बळकट होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### प्रत्येक परीक्षा केंद्रातील वर्गात सिसीटिव्ही, कॅमेरे नसल्यास

१२वी साठी प्रत्येकी ७ भरारी पथके नियुक्त करण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रापासुन ५०० मीटर परीसरात झेरॉक्स सेंटर बंद ठेवण्यात यावे. परीक्षा केंद्राच्या परीसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना लागु करण्यात येणार आहेत. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युत करणारे, मदत करणारे, प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यावर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

### ना.पंकजाताई यांच्या लातूर जिल्ह्यात झंझावाती प्रचार सभा

कार्यालय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आदी असंख्य योजना राबवून कोटयवधीचा निधी आणला. बीड परळीसारखेच प्रेम दिले. आता राज्यात महायुतीचे सरकार आहे, अजितदादा अर्थमंत्री होते, त्यांच्या अकाली जाण्याचा धक्का आम्हा सर्वाना बसला आहे, आता सुनेत्रा ताई व आम्ही सर्व जण या भागाच्या विकासाला कुठे कमी पडणार नाहीत.

### जिल्हा परिषदेत सत्ता आणा

ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी केंद्र व राज्यात जशी भाजपची सत्ता आहे तशी सत्ता जिल्हा परिषदेत आणावी लागेल, त्यासाठी आमच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्य द्या असं त्या म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ग्रामीण जनतेच्या कल्याणाकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे, अनेक योजना त्यासाठी आणल्या आहेत तर दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवून महिलांना सक्षम केले आहे असं सांगून इथल्या मन्याड नदीच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न मार्गी लावू असं ना. पंकजाताईंनी सांगितलं.सभेला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी आमदार गोविंदराव केंद्रे, बब्रुवान खंदाडे, गणेश हाके, राहूल केंद्रे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

### उशीर होऊनही सभा जोरदार

ना. पंकजाताई मुंडे सकाळी छत्रपती संभाजीनगर येथून हेलिकॉप्टरने लातूर जिल्हयातील सभांना निघणार होत्या परंतू तांत्रिक बिघाड झाल्याने त्यांचे हेलिकॉप्टर नियोजित वेळेपेक्षा तीन तास उशीराने टेक ऑफ झाले, परिणामी सभा देखील उशीराने सुरू झाल्या, एवढा उशीर होऊनही सर्वच सभांना मतदारांनी मोठी गर्दी केल्याचे पहायला मिळाले.

### ॲड.सुरेश हात्ते यांना मातृशोक

त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावाई, नातवंडे - पतवंडे असा मोठा परिवार आहे. हात्ते कुटुंबियांच्या दु:खात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

### कै.विठ्ठलराव सरवदे यांचा पुण्यतिथी सोहळा

सर्व दे डॉक्टर सदाशिव सरोदे या चारही पुत्रांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पंचक्रोशीतील एका जिल्हा परिषद शाळेला वही व पेन विद्यार्थ्यांना भेट देत असतात व गावातील प्रमुख मान्यवरांचा त्यांच्या वतीने सत्कार देखील करण्यात येतो याप्रसंगी या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून लाभलेले माजलगाव तालुक्याचे माजी आमदार मोहनराव काका सोळंके तर अध्यक्ष म्हणून लोकनेते तेलगाव सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक आदर्श शिक्षक प्रकाश नाना शिंदे ज्येष्ठ मार्गदर्शक उद्धवराव धपाटे सर याप्रसंगी आपले मनोगत तुकाराम बापू येवले तालुकाप्रमुख शिवसेना यांनी केले व प्रस्ताविक अशोकराव डोने यांनी मांडले व प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन मोहनराव काका सोळंके यांनी शाळेसाठी साडेपाच हजार रुपये बक्षीस व एक कॉम्प्युटरचा सेट देण्याचे कबूल केले यावेळी गावातील व तालुक्यातील मान्यवर उपस्थित होते त्यापैकी नारायणराव राठोड नारायण बापू सातपुते ओबीसी महासंघाचे जिल्हाप्रमुख विलास नेमाने पांडुरंग भाऊ भले पांडुरंग भाऊ शिंदे सुग्रीचा शिंगाडे नितीन शिंदे विलास शिंदे ज्ञानेश्वर जाधव रंगनाथ भाऊ राठोड भगवान बापू रासवे शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय बाजीराव राठोड सर भास्कर गुरुजी शिंदे नाथा शिंगाडे सर माने सर सोळुंके मॅडम व याच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर राजकुमार राठोड सर यांनी आपल्या सुमधुर आवाजामध्ये सूत्रसंचालन केले व बाल कलाकारांनी मान्यवरांचे नृत्य रूपाने स्वागत केले व अध्यक्ष भाषण प्रकाश नाना शिंदे यांनी केले याप्रसंगी लऊळ गावातील इतरही मान्यवर उपस्थित होते सर्वांचे शब्द सोनवणे स्वागत करण्यात आले व त्यांच्यातर्फे सर्वांना एक वही व रुमाल देऊन सत्कार करण्यात आला.

### प्रियदर्शनी कन्या प्रशाला पाटोदा येथे इंग्लिश

प्रशाला शाळेच्या वतीने यशस्वी विद्यार्थिनींचा मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सचिन खोले यांच्यासह नवनाथ ढाकणे, दहिफळे, मुळे तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमप्रसंगी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले तसेच इंग्लिश ऑलिंपियाडमध्ये सहभागी झालेल्या सर्व मुलींनाही प्रोत्साहन देत त्यांचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थिनींच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण परिश्रम आणि पालकांचे सहकार्य मोलाचे असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थिनींनाही स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली असून भविष्यातही अशाच प्रकारे यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### समीर काझी यांच्या दुसऱ्या कन्येचाही साखरपुड्यातच

कन्या गौसिया हिचा सुद्धा साखरपुड्यातच आदर्श विवाह सोहळा उत्साहात संपन्न झाला. याबाबत समीर काझी यांचे ज्येष्ठ बंधू तथा महाराष्ट्र राज्य काझी सेवा संघाचे अध्यक्ष शफी काझी यांनी आपले वडील गुलाम नबी काझी व जमीअत उलेमा-ए-हिंदचे जिल्हाध्यक्ष मौलाना जाकेर सिद्दीकी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढाकार घेतला. यावेळी राजकीय, सामाजिक आणि अन्य सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

राज्यमंत्री पदाचा दर्जा प्राप्त असलेले महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांना नूरूलइमान व गौसिया ही दोन मुली आणि तौहीद व मुबशशिर ही दोन मुले असून त्यांची ज्येष्ठ कन्या नूरुलइमान हिचा शुभविवाह माजलगाव येथील प्रसिद्ध उद्योजक अतीक नाईक यांचे चिरंजिव तथा माजी उपनगराध्यक्ष खुर्शीद नाईक यांचे पुतणे फैज यांजबरोबर बीड शहरातील तेलगाव रोडवरील कोहिनुर लॉन्स येथे ४ जानेवारी २०२६ रोजी साखरपुड्यातच संपन्न झाला. शकील अहेमद सिद्दीकी यांचे चिरंजीव तलहा यांजबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवर व सर्व समाजबांधवांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील बीड बायपास रोड वरील आयकॉन सेलिब्रेशन मध्ये साखरपुड्यातच उत्साहात संपन्न झाला.

### राजस्थानी माध्यमिक विद्यालय सहयोग नगर शाळेचा विद्यार्थी

संकल्पनेमधून माझ्या संकल्पनेची द्वितीय क्रमांक म्हणून निवड झाल्यामुळे मला खूप आनंद होत आहे.यावेळी शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. देशमुख मॅडम, सौ. पंचारिया मॅडम, सौ. राऊत मॅडम, लोहिया सर,बागडे सर, इगडे सर व इतर कर्मचारी कुलकर्णी सर, शिंदे,कोठी यु, सौ. शिंदे इत्यादी उपस्थित होते.

### चव्हाण युवराज सर सेवानिवृत्त

अनिल जाधवर सर हे होते. यावेळी चव्हाण सर यांचा सपत्नीक त्रीकंवर चव्हाण यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष महादेवराव काळे अण्णा यांनी केला. यावेळी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मस्के सर यांनी केले तर आभार प्रदर्शन शेख सर यांनी मानले.

पान १ वरून

### मुख्याधिकारी फडसेंचा बदलीसाठी अर्ज

गरजेचे आहे. त्यासाठी सर्वपक्षीय नगर सेवकांनी एकत्र येऊन त्यांची बदली होऊ नये, त्यांनी बीडमध्येच रहावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### ॲड.व्ही.डी.साळुंके यांना निवडूण देण्याचे आवाहन

महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेचे सलग चार वेळा सदस्यपद तसेच अध्यक्षपद भूषविलेले ॲड.वसंतराव साळुंके यांनी माजलगाव वकील संघाला आवर्जुन भेट दिली. या प्रसंगी वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड.एम.एन.जाधव यांनी साळुंके यांचे स्वागत केले. या प्रसंगी ॲड.बी.आर.डक, ॲड.व्ही.जी.तिडके, ॲड.एम.ए.डोंगरदिवे, ॲड.रत्नाकर चौकीदार, ॲड.व्ही.एस.जोशी, ॲड.घाडगे, ॲड.सचिन सुतळे, ॲड.एस.यू.सोळुंके, ॲड.शिवप्रसाद शर्मा यांची भाषणे झाली. उपस्थितांनी ॲड.साळुंके यांना पाठिंबा व्यक्त करुन निवडूण देण्याचे आवाहन केले. ॲड.साळुंके यांच्यासोबत खंडपीठाचे ॲड.भिसे व ॲड.नाडे हे उपस्थित होते.

### तक्रार करण्यासाठी गेलेल्या टिप्परवाल्यांवरच दंडाचा बोजा

घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी टिप्पर मालकांचीच उलट तपासणी करत एकही टिप्पर नियमानुसार वाळू वाहतुक करत नसल्याचा ठपका ठेवत ज्यांच्याकडे तीन ते चार टिप्पर आहेत आणि जे एका इनव्हाईसवर चार ते पाच फेऱ्या करुन प्रशासनाची दिशाभूल करत आहेत त्यांची माहिती एकत्रित करुन त्यांच्या टिप्परवर लाखो रुपयांच्या दंडाचा बोजा टाकण्यात येणार आहे.

### मांजरसुंबा घाटात धावत्या कारने पेट घेतला

मात्र गाडीला चारही बाजुंनी आगीने वेढल्याने यामध्ये इर्टिगा कार पूर्णपणे जळून खाक झाली आहे. रोडवरच कारने पेट घेतल्यामुळे घाटातील वाहतुक काही वेळ विस्कळीत झाली होती.

### बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी सुनेत्राताई

पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत. विशेष म्हणजे दादांचे अपुर्ण स्वप्न पुर्ण करण्याची जबाबदारी आता पालक म्हणून उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी घेतली आहे.

### कामे न करताच बोगस बिले उचलली...

जलसिंचन विहिरी, गाय गोठा व रस्ते, खडीकरणाची कामे कागदोपत्री दाखवून प्रत्यक्षात कोणतेही काम करण्यात आलेले नाही. या कामांचे ऑनलाईन वर्ककोड तयार करुन मोठ्या प्रमाणात निधीची उचल करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. भाऊसाहेब सीतगूर यांचे शेत ते बुधनर यांचे शेत खडीकरण या कामाचा वर्ककोड १८१८००११७३/आरसी/१२३५७६९९५२ अंतर्गत दाखविलेले काम पूर्णत: बोगस असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. इतरही अनेक कामे कागदावर दाखवून निधीचा अपहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सन २०२३-२४ मध्ये जे.एस.व्ही. शेख सिराज शेख रज्जाक (१८१८००११७२/आयएफ/१२३५८६८६२८), जे.एसह्न.व्ही. शेख तसीम रियाज (१८१८००११७३/आयएफ/१२३५८६८६३३) त्यानंतर सन २०२५-२६ मध्ये सी.एस.गाय गोठा (शेख इम्रान शेख रज्जाक- १८१८००११७३/आय.एफ./१२३६६९४४१६), सीएस गाय गोठा (शेख सिराज रज्जाक - १८१८००११७३/आय.एफ./ १२३६६९४४२०), सी.एस.गाय गोठा (शेख रियाज रज्जाक - १८१८००११७३/आय.एफ./ १२३६६९४५४८) ही वर्ककोड असलेली कामे न करता इंजिनीयर, ग्रामसेवक, सरपंच, रोजगार सेवक, ऑपरेटर यांनी बोगस दस्तऐवज करुन पंचायत समितीमधून बोगस बिले उचलले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या सर्व कामांची चौकशी करुन संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी तक्रारदार शेख आमिर शेख अहमद, शेख निसार शेख गुलाब यांनी केली आहे.

विकणे आहे

लता साखरे यांच्या नावावरील खुली जागा विकणे आहे. साईज 20 X 62 पाटोदा (ममदापुर येथील ता.अंबाजोगाई जि.बीड

16530

:: संपर्क ::

मो.नं.8180834022

### जिल्हा युवा सेनेच्या वतीने कर्करोग जागृती अभियान

व डॉ.किरण वनवे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणार आहे. खा.श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसा निमीत्त ही शिबिरे युवा सेना व डॉक्टर सेलच्या वतीने घेण्यात येणार आहेत. आज दुपारी १ वाजता बीड शहरात हे शिबीर आयोजीत करण्यात आले असून शिबीराचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन अजिंक्य मुळे व डॉ.किरण वनवे यांनी केले आहे.

### २६५ जातीच्या उसाची नोंद घ्या...

उसाची तातडीने नोंद घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.

थावरे यांनी सांगितले की, साखर आयुक्त कार्यालयाने ७ डिसेंबर २०१७ रोजी सहकारी व खासगी साखर कारखान्यांच्या कार्यकारी संचालक व जनरल मॅनेजरांना २६५ जातीच्या उसाची नोंद न घेण्याचे आदेश दिल्याचा संदर्भ देत कारखाने जबाबदारी झटकत आहेत. मात्र प्रत्यक्षात अतिवृष्टीमुळे शेतकरी अडचणीत सापडला असून अनेक ऊस जातींवर रोग पडल्याने उत्पादनात मोठी घट झाली आहे.

यावर्षी आंदोलनाच्या माध्यमातून ऊस दर प्रतिटन २७७५ रुपये निश्चित करण्यात आला असतानाच, जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात बाहेरच्या साखर कारखान्यांचे हार्वेस्टर बीड जिल्ह्यात दाखल झाले. या कारखान्यांनी वाहतूक व तोड खर्च न करता प्रतिटन २९०० ते ३१५० रुपये दर देऊ केला. पुणे जिल्ह्यातील दौंड साखर कारखान्याकडून माजलगाव तालुक्यातील उसाला एवढा दर मिळत असताना, सुमारे २५० किलोमीटर अंतर असूनही तो परवडत असेल, तर माजलगाव व बीड जिल्ह्यातील साखर कारखाने २७७५ रुपयांवरच का अडून बसले आहेत, असा सवाल थावरे यांनी उपस्थित केला.

माजलगाव व बीडमधील कारखान्यांतून मीठ निघते आणि माजलगावातून दौंडला गेलेल्या उसातून साखर निघते का, असा खोचक प्रश्न उपस्थित करत २६५ जातीच्या उसाची तातडीने नोंद घ्यावी, ऊस दरात वाढ करून शेतकऱ्यांच्या घामाचा दाम त्यांना मिळावा, अशी जोरदार मागणी थावरे यांनी केली आहे.

अन्यथा मार्च रोजी साखर आयुक्तांची पुणे येथे गाडी अडवून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा ठाम इशारा शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.

### वन विभागाच्या नाकावर टिच्चून वृक्षतोड...

अनेकवेळा तक्रारी केल्या, मात्र अधिकारी पूर्णपणे झोपेचे सोंग घेत आहेत. त्यामुळेच वन विभागातील अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून लाकडाची मोठ्या प्रमाणावर वाहतुक होऊ लागली आहे. या संदर्भातील सर्व पुरावे जिल्हाधिकाऱ्यांकडे देणार असल्याचे सुशील पिंगळे यांनी म्हटले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४२) २३०१०१.

AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी



## सोमनाथ मंडलिक व राहुल शिंदे यांची राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी निवड

बीड दि ३(प्रतिनिधी)- खो-खो इंडिया या नवख्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेच्या व कर्नाटक खो-खो असोसीएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वरिष्ठ गट पुरुष महिला स्पर्धेचे फेब्रुवारीमध्ये आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये देशातील एकूण २८ राज्य व प्रथमच सहभागी होणारे दमण दिव हा केंद्रशासित प्रदेश अशा एकूण २९ राज्य सहभागी होत आहेत. ही स्पर्धा साखळी पद्धतीने घेण्यात येणार असून ही स्पर्धा लाल मातीच्या क्रीडांगणावर घेण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी बीड जिल्हा खो-खो असोसिएशन व साई गणेश क्रीडा मंडळाचे खेळाडू सोमनाथ मंडलिक व राहुल शिंदे यांची निवड झाली आहे.





जिद्द, चिकाटी, सरवातील नियमितता, क्रीडांगणाशी असणारे नाते, एकाग्रता परिश्रम यांच्यामुळे या दोघांची राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली. हे दोन्ही खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी करून बीड जिल्ह्याच्या नावाचा आलेख क्रीडा क्षेत्रात उंचावतील असा विश्वास प्रशिक्षक व जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी नागरिकांनी व्यक्त केला. या खेळाडूंना राष्ट्रीय खो-खो प्रशिक्षक प्रा. डॉ. तानाजी आगळे सर व प्रा. चित्रा आगळे ताई यांचे मार्गदर्शन लाभले.खेळाडूंच्या या राष्ट्रीय स्पर्धेतील निवडीबद्दल जयदत्त अण्णा क्षीरसागर, आ. सुरेश आण्णा धस, डॉ. योगेश दादा क्षीरसागर, डॉ सारिकताई क्षीरसागर, आ. संदीप भैय्या क्षीरसागर, आ. विजयसिंह पंडित, राजू जाधव पाटोदा, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, योगेश करांडे, प्राचार्य प्रो. डॉ. बळीराम राख सर, उपप्रचार्य डॉ. अभय क्षीरसागर सर, डॉ. जगन्नाथ पटाईत, प्रा. नामदेव चांगण सर, पर्यावेक्षक प्रा. अनिल जोगदंड सर, प्रा. डॉ. कवारे सर, डॉ संजय बोडगे सर डॉ. पवन चांडक, डॉ. मनीषाताई गाडवे, प्रा. कावेरी खुर्णे, प्रा. रवी शिंदे, अनिल मोरे, विकास निकम, वैभव कंठाळे जिल्ह्यातील मान्यवर व क्रीडाप्रेमी नागरिक यांनी अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## सौ. के.एस.के.महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

बीड दि ३(प्रतिनिधी)-येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि.०६ फेब्रुवारी २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभासाठी नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली तर उद्घाटक श्री. विष्णु सुरासे प्रसिध्द हास्य कवी यांच्या हस्ते होणार आहे. स्नेहसंमेलनाचा संपुर्ण दिवस हा पारंपारिक वेषभुषेतील असेल. या निमित्ताने पाककला, पुष्परचना स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, गाण्यांच्या स्पर्धा, फनफेअर, विविध प्रदर्शन, शेलापागोटे, सांस्कृतीक कार्यक्रम, विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचे गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र व बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर यांच्याहस्ते होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे असतील. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री. जालिंदर कोळेकर यांनी केले आहे.

## बीड न.प.मध्ये शेख निजाम सत्कारित

बीड दि ३- बीड नगरपालिकेत नेते निजाम शेख यांनी स्वच्छता वैद्यक व सार्वजनिक आरोग्य सभापती पदाचा पदभार स्विकारल्याच्या निमित्ताने त्यांचा हृदयी सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

शहराच्या स्वच्छता, आरोग्य व सार्वजनिक सुविधांच्या विकासासाठी निजाम शेख यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार असून त्यांच्या नेतृत्वाखाली बीड शहर अधिक स्वच्छ व आरोग्यदृष्ट्या सक्षम होईल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.याप्रसंगी शेख शाकेर, रहेमत पठाण, फारुख शेख, इरफान शेख, जानी मामू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.उपस्थितांनी निजाम शेख यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांच्या पुढील वाटचालीस हृदयी शुभेच्छा दिल्या.

## आ.सौ नमिताताई मुंदडांच्या उपस्थितीत बोरी सावरगावात आरोग्य शिबीर संपन्न

केज दि ३(प्रतिनिधी)-तालुक्यातील बोरी सावरगाव येथील श्री गजानन महाराज सभा मंडप येथे आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. या उपक्रमात केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा यांनी सहभागी होत उपस्थित नागरिकांशी थेट संवाद साधला.

तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांच्या देखरेखीखाली या शिबिरात विविध वैद्यकीय तपासण्या राबविण्यात आल्या. नागरिकांसाठी रक्तदाब व मधुमेह तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली, तर महिलांसाठी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टरांमार्फत विशेष आरोग्य तपासणी करण्यात आली.

## दगडवाडी शिवारात दगड घालून मित्राचा खून करणाऱ्या आरोपीस एलसीबीच्या पट्ट्यांनी २४ तासात ठोकल्या बेड्या

बीड दि ३(प्रतिनिधी)- गुन्हा कितीही गंभीर व क्लिष्ट घडो, स्थानिक गुन्हे शाखा त्याचा छडा लावल्याशिवाय थांबत नाही. जिल्ह्यामध्ये कोणत्याही पोलीस स्टेशनच्या हद्दीत कोणतेही गंभीर गुन्हे घडो त्याची उकल करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेवरच येते . असे असताना पाटोदा पोलीस ठाण्याच्या हार्दिक असलेल्या दगडवाडी येथे दगडाने ठेचून खून करण्याचा प्रकार समोर आला असता आणि गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अवघ्या २४ तासात या गुन्हचा छडा लावला. मित्राचा खून करणाऱ्या इस्लामपूर पेठ बीड येथील अतिक गुलाब तांबोळी या आरोपीला वड्या ठोकण्याचे काम केले .

या संदर्भात सूत्रांनी सांगितलेली माहिती अशी की, १ फेब्रुवारी २०२६ रोजीचे रात्री ८ वा ते दि.२ फेब्रुवारी २०२६ रोजीचे सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान पोलीस ठाणे पाटोदा हद्दीतील दगडवाडी गावचे शिवारातील बीड ते शिरूर (का) जाणारे रोडचे डाव्या बाजुस ३० वर्षे वयाच्या चाँद अल्हाहुद्दीन तांबोळी व्यवसाय पेटींगचे काम रा. रायमोहा ता. शिरूर (का) याच्या डोक्यात दगड मारून त्याचा खुन केल्याची घटना घडली होती. सदर घटनेवरून पोलीस ठाणे पाटोदा येथे गुरन. ३०/२०२६ कलम १०३ भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर खुनाचा गुन्हा हा अज्ञात आरोपीने केल्याने गुन्हा उघडकीस आणने पोलीसा समोर मोठे आव्हान होते.सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील फौ. सुशांत सुतळे, श्रीराम खटावकर, पोह अशोक दुबाले, पोह सोमनाथ गायकवाड, पोह बाळु सानप, पोह राहुल शिंदे, पोह मारूती कांबळे, पोह युनुस बागवान, पोअ यादव, पोअ सुरवसे, पोअ अशफाक, पोअ परझणे, पोअ शेख, चापोअ हराळे यांचे पथक नेमले होते. सदरचे पथक तपास करीत असतांना त्यांना गोपनिय बातमीदार व तांत्रिक विश्लेषनाव्दारे माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा इसम नामे अतिक गुलाब तांबोळी रा.ईस्लामपुरा पेठ बीड याने केला आहे. त्यावरून नमुद पथकाने आरोपीचा शोध घेतला असता तो शासकीय रूग्णालय परिसरामध्ये मिळुन आला. त्यास प्रथम विचारपुस केली असता तो पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होता. पण पोलीस नीतीप्रमाणे विचारपूस केल्यानंतर त्याने सांगितले की, मी चाँद तांबोळी याच्याकडुन हात उसने पैसे घेतले होते. सदरचे पैसे परत घेण्यासाठी चाँद तांबोळी याने त्याच्याकडे पैशाचा तगादा लावल्यामुळे आरोपी अतिक याने चाँद अल्हाहुद्दीन तांबोळी डोक्यात दगड मारून जिवे ठार मारले आहे. तरी नमुद गुन्ह्यातील आरोपी नामे अतिक गुलाब तांबोळी रा. ईस्लामपुरा पेठ बीड यास ताब्यात घेवुन गुन्ह्याचे तपास कामी प्रभारी अधिकारी पोस्टे पाटोदा याच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्ह्याची पुढील तपास प्रभारी अधिकारी पाटोदा हे करीत आहेत.सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक



शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पोउपनि श्रीराम खटावकर, सुशांत सुतळे, पोह/अशोक दुबाले, पोह सोमनाथ गायकवाड, पोह बाळु सानप, पोह राहुल शिंदे, पोह मारूती कांबळे, पोह युनुस बागवान, पोअ यादव, पोअ सुरवसे, पोअ अशफाक, पोअ परझणे, पोअ शेख चापोअ हराळे यांनी केलेली आहे.

## अंबाजोगाई पोलिसांचा रिक्षा चालकांना सक्त इशारा क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसवने धोकादायक

अंबाजोगाई दि ३(प्रतिनिधी)- शहरातील शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या रिक्षा आणि व्हॅन चालकांनी सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा कडक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा कडक इशारा अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी दिला आहे. अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात आयोजित रिक्षा व व्हॅन चालकांच्या विशेष बैठकीत ते बोलत होते.



या महत्वपूर्ण बैठकीला अंबाजोगाई शहरातील सुमारे १५० ते १७५ रिक्षा व व्हॅन चालक उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी सर्व चालकांना गणवेश परिधान करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले. शाळेत जाणाऱ्या चिमुकल्या जीवांची जबाबदारी चालकांवर मोठी असते, त्यामुळे ही वाहतूक करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अनेकदा रिक्षांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसवले जातात, ही बाब अत्यंत धोकादायक असून यापुढे ओव्हरलोडिंग करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असेल, असे जोगदंड यांनी यावेळी बजावले.

वाहतुकीच्या नियमांबाबत मार्गदर्शन करताना चालकांनी आपली व वाहनाची सर्व वैध कागदपत्रे नेहमी स्वतःजवळ बाळगावीत, असेही सांगण्यात आले. विद्यार्थी वाहतूक करताना आवश्यक असणारी सर्व सुरक्षा उपकरणे आणि उपाययोजना वाहनात असणे अनिवार्य आहे. याचबरोबर शहरात वाढणाऱ्या वाहतूक कोंडीचा विचार करता, बस स्थानक परिसर किंवा सार्वजनिक रहदारीला अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी रिक्षा उभ्या करू नयेत, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.यावेळी उपस्थित रिक्षा चालकांनीही आपल्या दैनंदिन कामात येणाऱ्या अडीअडचणी पोलिसांसमोर मांडल्या. . सर्व वाहनधारकांना येत्या सोमवारपर्यंत आपली कागदपत्रे आणि इतर त्रुटी पूर्ण करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. ही मुदत संपल्यानंतर पोलीस वाहतूक विभागामार्फत शहरात विशेष मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमित दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

## नर्सिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी रुग्णसेवेचे प्रमाणीक कर्तव्य बजावले पाहीजे- ह.भ.प.महंतश्रीराम महाराज विडेकर



केज दि ३ (प्रतिनिधी)- नर्सिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी निस्वार्थ सेवा,करुणा,आणि समर्पण या मूल्यांचे पालण करत नर्सिंग व्यावसायातील आपल्या जबाबदाऱ्या समजून घेऊन रूग्णसेवेचे प्रमाणीकपणे कर्तव्य बजावले पाहिजे असे प्रतिपादन ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी केले.

रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव संचलित रेणूका नर्सिंग स्कूल विडा येथील जी एन एम प्रथम वर्षातील विद्यार्थांचा शपथ ग्रहण सोहळा व दिपप्रज्वलन कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते.कार्यक्रमाचा शुभारंभ ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर (साधू शिवरामपुरी मठ संस्थान विडा यांच्या शुभहस्ते तर संस्थेचे उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.नर्सिंग व वैद्यकीय क्षेत्रातील सद्यस्थिती,भविष्यातील संधी तसेच गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा व करिअरच्या संधी यावर संस्थेचे उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.प्रसंगी विडा प्रा.आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी रोशनकुमार गायकवाड,आंधळेवाडीचे सरपंच नामदेव आंधळे,जेष्ठ नेते अशोक वाघमारे,युवा नेते ऋषिकेश पटाईत,सुंदर जाधव,कृष्णा अर्बन बँकेचे उपाध्यक्ष चंद्रकांत कुलकर्णी,संस्था समन्वयक नवनाथ काकाड सर,विशाल इंगळे सर,शिवरामपुरी पतसंस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.सुनिता पवार, रामकृष्ण महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक राम काटकर सर,लिंबराज ढेंगे,बप्पा बर्दापूरकर,चौरे ,किशोर देशमुख,तुषार राऊत रेणुका नर्सिंग स्कूलचे प्रा.रवि मुळे,सौ.सुनिता मुंडे मॅडम,शिंदे सर,देशमुख सर,केदार सर,हांडगे सर यांच्यासह विद्यार्थी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शिवमहोत्सव कडा शहर कार्यकारणी जाहीर समितीकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन

कडा दि ३ (प्रतिनिधी)- सालाबाद प्रमाणे या वर्षी सुद्धा मोठ्या थाटा माटात कडा शहरात शिवमहोत्सवाचे आयोजन केलेले आहे. सर्व कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून कार्यकारिणी सर्वानुमते ठरवण्यात आली कार्यकारिणीत ज्ञानेश्वर कर्डिले (अध्यक्ष),सागर शिंदे (उपाध्यक्ष), अर्जुन गावडे (सचिव),सह या वर्षीची कार्यकारीणी सर्वानुमते स्थापन करण्यात आली. तशी सर्व कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली. जयंतीनिमित्त सोमवार, १६ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वा होम मिनिस्टर क्रांती मळेगांवकर (सन्मान स्त्री शक्तीचा सोहळा आनंदाचा-खेळपैठणीचा) मंगळवार, दि.१७ रोजी रात्री ८ वाजता ह.भ.प. कबीर महाराज आत्तार (राष्ट्रीय शिवशंभू व्याख्याते) झी टॉकीज मन मंदिरा फेम बुधवार, दि.१८ रोजी सकाळी.८ वा शिवमूर्ती दुग्धभिषेक संदिप देवा दाणी सांगवीकर यांच्या वेद मंत्रात सायंकाळी ६ वा गडकिल्ले बक्षीस वितरण रात्री. ८ वा. युवा शाहीर प्रसाद आदिनाथ विभूते शाहिरी शिवदर्शन'' पोवाडे व लोकगीतांचा कार्यक्रम तर गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव सोहळा सकाळी १० वा.शिवस्मारक पूजन स.१० वा. ते दु.२ वाजेपर्यंत महा रक्तदान शिबीरसायं.४वा. ते रात्री. १२ वाजेपर्यंत कडा शहरात भव्य शोभा यात्रा यासह इतरही कार्यक्रमाची रेलचेल प्रेक्षकांना पहावयास




मिळणार आहे तरी या कार्यक्रमाचा सर्व प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने आनंद व लाभ घ्यावा अशी विनंती शिवजन्मोत्सव कडा यांच्या वतीने करण्यात आली आहे.

## वृत्तपत्र सृष्टीच्या इतिहासातील कार्यांचा आदर्श वर्तमान युगातील वृत्तपत्रांनी घ्यावा-डॉ.सानप

छत्रपती संभाजी नगर दि.३ (प्रतिनिधी) -भारतीय स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून स्वातंत्र्योत्तर कालखंडा पर्यंतचा भारतीय वृत्तपत्र सृष्टीचा इतिहास अभिमानास्पद असून त्यांच्या कार्याचा आदर्श वर्तमान युगातील वृत्तपत्रांनी घेण्याची आवश्यकता आहे. असे मत प्राचार्य डॉ.नामदेव सानप यांनी व्यक्त केले. छत्रपती संभाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयात मूकनायक दिन साजरा करण्यात आला यावेळी ते बोलत होते.पुढे बोलताना डॉ. सानप म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये दीनदलित, मागास, वंचित आणि अविकसित घटकांच्या उत्कर्षासाठी वृत्तपत्राचा एक शस्त्र म्हणून वापर केला. वर्तमान युगातही या घटकांच्या अनेक समस्या आहेत त्या सोडवण्यासाठी वर्तमान युगातील वृत्तपत्रांनी भारतीय वृत्तपत्र सृष्टीच्या इतिहासातील कार्याचा आदर्श घेऊन समाजातील वंचित मागास अविकसित घटकांचे समर्थपणे नेतृत्व करण्याची आवश्यकता आहे. त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी नेतृत्व करण्याची गरज आहे. असेही डॉ. सानप यांनी म्हटले.

प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेंद्र भगत यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. अस्मिता साळवे यांनी केले. यावेळी प्रा. ज्योती मोरे प्रा. डॉ.सोनल उबाळे प्रा. हर्षद वाघमारे पवन मस्के संतोष प्रधान प्रा. तुबा सय्यद प्रा.उत्कर्ष इंगोले प्रा. नबीहा खान यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## रस्ता अपघातात तरुणाचे प्राण वाचवणारे बाजीराव ढाकणे पत्रकाराकडून सन्मानित

बीड दि ३ (प्रतिनिधी) केज बीड रस्त्यावर असलेल्या अंबाडाचे बरड येथे अपघात होऊन खड्ड्यात पडलेल्या आष्टी तालुक्यातील तरुणाला मौजे तातडीने रुग्णवाहिका बोलावून जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठवून सदर तरुणात जीवदान देणारे तालुक्यातील सामाजिक कार्यकर्त्या उत्सव आशाताई बाजीराव ढाकणे व बाजीराव ढाकणे यांचा पत्रकारांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

माहिती अशी की तालुक्यातील जोला येथील सौ. आशाताई बाजीराव ढाकणे व बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी गुरूवार दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी केज - बीड रोडवरील आंबाळाच्या बरडाच्या पुर्वेस असलेल्या पुला जवळ रस्त्यालगतच्या खड्ड्यांमध्ये अपघात होऊन बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या धिरज भानुदास भवर मु. आष्टा हरीनारायण, ता. आष्टी या तरुणास त्यांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेतून बीड येथील जिल्हारुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

## दत्तू देसाईसह पदाधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यांमधून स्वागत

आष्टी दि ३( प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटना ४५/११ शाखा आष्टीची स्थापना जिल्हा सचिव अमोल तुपे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात करण्यात आली. यावेळीआष्टी तालुका कार्यकारिणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी दत्तू देसाई, तालुका सचिवपदी संजय काकडे, तालुका उपाध्यक्षपदी वैभव खिळे व विकास शिरसागर यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे कर्मचारी वर्गांमधून स्वागत होऊ लागले आहे

या संघटनेवय सदस्य म्हणून राहुल साबळे, महेश जठार, ऋषिकेश शेळके, राजेंद्र खिळे, नाना पवार, शंकर झुनगुरे, हारी शेलार, समीर सय्यद व अनिल पांडुळे यांची नियुक्ती करण्यात आली.यावेळी जिल्हा सचिव अमोल तुपे यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या, सेवा सुरक्षा, वेतनवाढ, पदोन्नती व कर्मचारी हक्कांबाबत मार्गदर्शन केले. संघटनेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी एकसंघपणे लढा देण्याचे आवाहन त्यांनी केले.आष्टी तालुक्यात संघटनेच्या स्थापनेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसे निवड झालेल्या कर्मचारी पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## शिवजयंती व महाशिवरात्रीनिमित्त केतुरा येथे भव्य सप्ताहाचे आयोजन

बीडदि. ३ (प्रतिनिधी) - शिवजयंती व महाशिवरात्रीनिमित्त केतुरा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. वैकुंठवासी ह. भ. प. महादेव महाराज नारायण गडकर यांच्या कृपा आशीर्वादाने तसेच ह. भ. प. प्रेममूर्ती शिवाजी महाराज नारायण गडकर यांच्या शुभहस्ते आणि उत्तराधिकारी ह. भ. प. संभाजी महाराज नारायण गडकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १३ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा सप्ताह संपन्न होणार आहे.या सप्ताहात दररोज पहाटे काकडा, विष्णुसहस्त्रनाम, हरिपाठ व कीर्तन असे दैनंदिन धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. तसेच दुपारी २ ते५ या वेळेत ह. भ. प. गणेश महाराज ढोबळे




(आळंदी) यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान दररोज रात्री ९ ते ११कीर्तन होणार आहे .यात १३ फेब्रुवारी भागवताचार्य ह. भ. प. सिद्धेश्वर महाराज बागलाने, १४ फेब्रुवारी रोजी ह. भ. प. मधुसूदन महाराज गवारे, १५ रोजी रा ह. भ. प. भानुदास महाराज शास्त्री , १६ रोजी रात्री ह. भ. प. विनोदाचार्य योगेश महाराज आकात , १७१७ रोजी रात्री ह. भ. प. निलेश महाराज वाणी, भागवताचार्य (देवगड), १८ फेब्रुवारी रोजी र ह. भ. प. बळीराम महाराज आवटी , १९ रोजी शिवचरित्रकार सुषेन महाराज नाईकवाडे, १० फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते११ ह. भ. प. प्रेममूर्ती शिवाजी महाराज नारायण गडकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. दरम्यान ह. भ. प. शिवाजी महाराज नारायण गडकर यांच्या नर्मदा परिक्रमेच्या पूर्णत्वानिमित्त तसेच ह. भ. प. संभाजी महाराज नारायण गडकर यांची उत्तराधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल २० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता भव्य व दिव्य अशी ऐतिहासिक शोभायात्रा काढण्यात येणार आहे. तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे, काल्याचे किर्तन व यानंतर महाप्रसादाचा लाभ घ्यावा अशी आग्रहाची विनंती शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, विश्वस्त नारायण गड समिती व समस्त गावकरी मंडळ केतुरा यांनी केली आहे.

## सफेपुर येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे आरोग्य शिबिर संपन्न

नेकनूर दि ३(प्रतिनिधी)-माऊली विद्यापीठ के संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनुर व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिरामध्ये आरोग्य शिबिर घेण्यात आले या शिबिरामध्ये डॉ. मुख्तार शेख व त्यांची टीम सपेपूर येथे आली होती त्यांनी या शिबिरातील युवक व युवतींचे तसेच गावातील नागरिकांचे रक्त तपासणी करून त्यांना आरोग्य विषयी सल्ला दिला या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ढास डी.के. व रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. इनकर व्ही.एस. व प्राध्यापक रामरुले डी.के. हे उपस्थित होते

## भगवान श्रीकृष्ण आश्रम येथे रामकथा व विष्णु याग मंडपाचे संत महंत व भाविकाकडून केले

केज दि ३ (प्रतिनिधी)- केज शहरा बीड रोड वरील भगवान श्रीकृष्ण आश्रम येथे रामकथा व महा विष्णु याग मंडपाचे संत, महंत व भाविक भक्तांनी सोमवार दि. २ फेब्रुवारी रोजी पुजन केले.सदर मंडप उभारणी साठी १ महीण्याचा कालावधी लागणार असुन राजस्थान येथील कारागीर दाखल झाले आहेत. यावेळी धर्म ध्वजारोहण करण्यात आले असुन पुरोहित रमेशराव कुलकर्णी तांबवेकर गुरुजी यांनी मंत्रोच्चाराच्या घोषात पुजन करण्यात आले. यावेळी साधना स्थली लाडे वडगाव येथील स्वामीजी ह.भ.प.भारतानंद सरस्वतीजी, भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री, ह.भ.प. विष्णु महाराज शास्त्री यांच्या सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुजना नंतर पुंडलिक वरदा हारी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम मंत्रांच्या जय घोषात भक्तांनी श्रीफळ वाढवून मंडप उभारणीचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी ह.भ.प.स्वामी भारतानंदजी सरस्वती यांनी आशिर्वादपर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री यांचा हेतु प्रांजळ असुन तो सिद्धीस जाणार आहे. समाजातील गोर गरीब, शोषित, वंचीत, दिव्यांग बांधवांना दरवर्षी गरीबांची दिवाळी साजरी करुन त्यांना जीवनासाठी आवश्यक साहित्याचे वाटप करून गोडधोड भोजन देऊन दिवाळी सण साजरा केला जातो.सर्व भाविक भक्तांनी सढळ हातांनी सहकार्य करावे व रामकथा व महा विष्णु यागामध्ये सहभागी व्हावे व भव्यदिव्य भगवान श्रीकृष्ण मंदिर उभारणीच्या पवित्र सोहळ्याचे साक्षीदार व्हावे असे आवाहन केले.

# संपादकीय

## फेसबुकचा वाढदिवस

विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २२ वर्ष पूर्ण झाली . याचाच अर्थ आज फेसबुकचा बाविसावा वाढदिवस आहे. आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या तीनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्र्यूआर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २२ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. जगातील जवळपास पंधरा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुकने आता वापरकर्त्यांसाठी ए आय ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे वापरकर्ते ए आय च्या मदतीने आपल्याला हवी ती माहिती क्षणार्धात मिळवू शकतात. तसेच ए आय चा वापर करून आपले फोटो, व्हिडिओ, रिल्स, व्हिडिओ शेअर करू शकतात. फेसबुकवर दररोज अब्जावधी फोटो, व्हिडिओ आणि रिल्स शेअर केले जातात. तसेच फेसबुकवर दररोज अब्जावधी पोस्टचा पाऊस पडतो. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. आज इंस्टाग्रामवर अधिक वेळ घालवत असली तरी फेसबुक ही त्यांना तितकेच प्रिय आहे. फेसबुकवर सर्वच वयोगटातील लोकांचे अकाऊंट आहे. प्रत्येकाला फेसबुक जवळचा वाटतो. फेसबुक नंतर अनेक सोशल नेटवर्किंग साईट आल्या पण फेसबुकने आपला दर्जा कायम ठेवला त्यामुळेच २२ वर्ष होऊनही फेसबुकची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. सर्वांच्या लाडक्या फेसबुकला २२ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

### नागेशवाडी येथे बिबट्याचा गाई वासरावर हल्ला

# जीव गेल्यावर भरपाई देण्याऐवजी अगोदर बिबट्याचा बंदोबस्त करा-आप्पासाहेब थोरवे

डोंगरकिन्ही दि ३ (प्रतिनिधी) -पाटोदा तालुक्यातील पारनेर पासून जवळच असलेल्या नागेशवाडी येथे मारोती मंदीराजवळ भरवस्तीत असलेल्या जनावरांच्या गोठ्यात दि. २ फेब्रुवारी रोजी रात्री बिबट्याने केलेल्या हल्यात वासरु गंभीर जखमी झाले आहे. बिबट्याच्या हल्यात माणूस किंवा जनावरे मेल्यावर भरपाई देण्याऐवजी वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने आप्पासाहेब थोरवे यांनी केली आहे.

सविस्तर वृत्त असे की, पारनेर पासून जवळच डोंगरपट्यात नागेशवाडी ही चारशे ते पाचशे लोकांची वस्ती आहे. गेल्या अनेक दिवसांपासून परीसरात बिबट्याचा वावर सुरु असल्याची माहिती वनविभागास दिली होती. बिबट्या पकडण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलण्याऐवजी एखादा कर्मचारी पाठवून लोकांची समजूत काढत आहेत. नागेश वाडी येथील शेतकरी श्री आप्पासाहेब थोरवे यांच्या वस्तीजवळ असलेल्या गोठ्यात गेल्या वर्षी बिबट्याने तीन शेळ्या मारल्या होत्या. त्याचीच पुनरावृत्ती करत बिबट्याने २ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास गोठ्यामध्ये गाई व वासरावर हल्ला केला होता यामध्ये वासरु गंभीर जखमी झाले आहे ते वाचण्याची शक्यता कमी असल्याचे डॉक्टर सांगतात. वासराच्या पोटाला चार टाके पडले असून मानेला व पायाला गंभीर जखमा आहेत. गोठ्यामध्ये ६ गाई १ म्हैस व ४ वासरे होते. जनावरांनी मोठा ओरडा केल्याने अधिक हानी टळली मात्र ग्रामस्थांमध्ये भयंकर भितीचे वातावरण पसरले आहे. दिवसा व रात्री शेतीकडे फिरणे अवघड झाले आहे. पशुवैद्यकीय अधिकारी यांची तात्काळ मदत मिळत नाही तेही



टोलवाटोलवी करतात, तर वन अधिकारी म्हणतात काळजी करू नका वासरु मेल्यावर नुकसान भरपाई साठी क्लेम करु. बिबट्याच्या हल्यात माणूस किंवा जनावरे मेल्यावर भरपाई देण्याऐवजी वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने आप्पासाहेब थोरवे यांनी केली आहे.

# निविदा प्रक्रिया पूर्ण करून विकास कामे सुरु करा –अ‍ॅड.विकास जोगदंड

बीड दि ३ (प्रतिनिधी)- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतील प्रस्तावित विकास कामे करण्यासंदर्भात निविदा प्रक्रिया पूर्ण करून अनुसूचित जाती आरक्षित प्रभागातील विकास कामे तात्काळ सुरु करण्यात यावे, या आशयाची मागणी मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांना माजी नगरसेवक ड विकास जोगदंड यांच्या सह शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनातून केली आहे.

नगर परिषद हद्दीतील पेठ बीड भागातील प्रभाग क्र ४ नागोबा गल्ली, वीरशैव कॉलनी, चांदणे वस्ती, बलभीम नगर, रमाई कॉलनी, पुनर्वसन कॉलनी, प्रभाग क्र १९ शिक्षक कॉलनी, व बीड शहरातील प्रभाग क्र १३ इंदिरा नगर इत्यादी प्रभागातील महिला व पुरुष सार्वजनिक शौचालयाची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून सार्वजनिक शौचालयाचा वापर करणाऱ्या माता, भगिनीं, बांधवाची मोठी गैरसोय होत असल्याने, सदरील प्रभागातील महिला व पुरुष सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे गरजेचे असल्याने, तसेच तेथील नागरिकांची त्या संदर्भात मागणी असल्याने सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करण्यात यावी. अशी मागणीही मुख्याधिकारी नगर परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनातून भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक / अध्यक्ष तथा माजी नगरसेवक ड विकास जोगदंड यांच्यासह त्यांच्या सहकार्यांनी केली

# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना समारंभ




बीड दि ३ (प्रतिनिधी) -शहरातील तुलसी इंग्लिश स्कूल, येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना शनिवार दि. ३१ रोजी समारंभपर्वक निरोप देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांना अभिवादन करून करण्यात आली. यावेळी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्येष्ठ विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण उत्साहपूर्ण केले.प्राचार्या उमा जगतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले निरोप समारंभाच्या निमित्ताने मनोगत व्यक्त करताना अनेक विद्यार्थ्यांनी भाऊक पणे आठवणीला उजाळा दिलायावेळी शाळेच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला मुंडे यांनी केले, तर आभार वर्षा जावळे यांनी मानले.

# देवठाणा-जैतापुर येथे होत असलेले विद्युत कामे दर्जेदार न केल्यास आंदोलन करू-भागवत दराडे

दिंद्रुड दि.३ (प्रतिनिधी) - देवठाणा-जैतापुर, शेरीतांडा येथे होत असलेले विद्युत कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात येत असुन, विज कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष देऊन ही सर्व विद्युत कामे दर्जेदार व चांगल्या प्रतिचे करून घ्यावे.अन्यथा यासाठी आंदोलन करण्यात येईल. असा इशारा देवठाणा-जैतापुरचे सरपंच तथा सामाजिक युवानेतृत्व भागवत दराडे यांनी एका निवेदनाव्दारे दिला आहे.

यासंदर्भात विज कंपनीच्या तेलगाव उपविभागीय कार्यालयास दिलेल्या निवेदनात धारूर तालुक्यातील देवठाणा-जैतापुर ग्रुप ग्राम पंचायत सरपंच तथा सामाजिक युवानेतृत्व भागवत दराडे यांनी म्हटले आहे की, देवठाणा-जैतापुर ग्रुप ग्राम पंचायत अंतर्गत देवठाणा, जैतापुर, शेरीतांडा व इतर ठिकाणी विज कंपनीच्या वतीने विद्युत पोल बसवणे, विद्युत तारा ओढणे, नवीन विद्युत ट्रान्सफॉर्मर बसवणे यासह इतर विद्युत कामे करण्यात येत आहेत. मात्र सदरील कामे ही अंदाजपत्रकास बगल देत अत्यंत निकृष्ट दर्जाचे व संबंधिताच्या मनमानीने खुपच निकृष्ट केली जात आहेत. विद्युत ट्रान्सफॉर्मर तर रस्त्यावरच बसवले जात असुन,



ताराची उंचीही खुपच खाली असल्याने ते धोकादायक असुन यामुळे नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो.याबाबत सदर कामे करणारास याची माहिती दिली.मात्र ते याकडे दुर्लक्ष करत आपल्या मनमानीनुसार निकृष्ट काम करत आहेत. तरी विज कंपनीच्या संबंधित जबाबदार अधिकारी यांनी याची गंभीरतेने दखल घेऊन देवठाणा, जैतापुर, शेरीतांडा येथे होत असलेले निकृष्ट विद्युत कामे तात्काळ थांबवुन, ते दर्जेदार व चांगल्या प्रतिचे करून घ्यावे.जर ते कामे दर्जेदार करून घेतली नाही.व यामुळे एखादी दुर्घटना घडली. तर त्यास सर्वस्वी आपण जबाबदार राहताल.तसेच यासाठी आंदोलन ही छेडण्यात येईल. असा कडक इशाराही युवानेतृत्व तथा सरपंच भागवत दराडे यांनी दिला आहे.

# गुरुकुलचा उपक्रम सलग तीन वर्षे राबवणारे आदित्य महाविद्यालय देशात अद्वितीय-डॉ.संतोष नेवपूरकर

बीड दि ३ (प्रतिनिधी)- आदित्य तीर्थात्त-शास्त्रार्थ गुरुकुलचा उपक्रम हा एका प्रायव्हेट महाविद्यालयाने सुरु केलेला सलग तीन वर्षानंतर ही अविरत सुरू असणारा संपूर्ण भारत देशातील एक अद्वितीय कार्यक्रम आहे. हा उपक्रम संस्थेच्या संचालकांनी विद्यार्थ्यांकरिता साधु वृत्तीने चालू केलेला कल्याणकारी उपक्रम असून येथे विद्यार्थी निवास, भोजनगृह, अध्ययन कक्ष, अधिकारी निवास यांना, पूर्वी आयुर्वेदातील उल्लेखनीय कार्य केलेल्या वैद्यांची जी नावे दिली आहेत ती अतिशय कौतुकास्पद व अनुकरणीय गोष्ट आहे. असे गौरवोद्गार आदित्य आयुर्वेद महाविद्यालय द्वारा आयोजित आदित्य तीर्थात्त-शास्त्रार्थ गुरुकुलाच्या उद्घाटन राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठाचे राष्ट्रिय गुरु डॉ. संतोष नेवपूरकर यांनी काढले.

आदित्य तीर्थात्त-शास्त्रार्थ गुरुकुल शिबिर ३१ जानेवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान संस्थेच्या शेतामध्ये, निसर्गरम्य व शांत वातावरणात आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय आयुर्वेद



विद्यापीठाचे राष्ट्रिय गुरू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलतना ते म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांना अशा पद्धतीने घडवण्यासाठी डॉ. आदिती मॅडम ह्या विद्यार्थ्यांच्या आई होऊन आयुर्वेदाचे भवितव्यच घडवीत आहेत. आदित्य शिक्षण संस्था, बीड यांच्या वतीने आयोजित आदित्य आयुर्वेद महाविद्यालय अंतर्गत संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य तीर्थात्त-शास्त्रार्थ गुरुकुलाचे आयोजन करण्यात आले आहे. ३१ जानेवारी २०२६ ते ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सर्व विद्यार्थी वास्तव्यास असतील. या काळात वैद्यकीय क्षेत्रातील दिग्गज व अनुभवी वैद्य उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय गुरु वैद्य.संतोष नेवपूरकर उपस्थित होते. संस्थेच्या संचालिका डॉ.आदितीजी सारडा यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की विद्यार्थी घडवणे हेच संस्थेचे ध्येय आहे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मयूरी शिंदे व प्रास्ताविक प्राचार्य डॉ.विवेक कुलकर्णी तर आभार प्रा.रामेश्वर ढोबळे यांनी मानले .

# प्रा.अनिता बर्दापूरकर यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार संपन्न



अंबाजोगाई दि ३ (प्रतिनिधी)- येथील खोलेश्वर महाविद्यालयातील प्रा.अनिता बर्दापूरकर या ३४ वर्षाच्या सेवेतून शनिवार दि.३१ जानेवारी रोजी निवृत्त झाल्या त्यानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.यानिमित्त महाविद्यालयाच्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे सभागृहात झालेल्या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष डॉ. अतुल देशपांडे हे होते. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी, खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह किरण कोदरकर, माजलगावच्या सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, प्राचार्य डॉ. दीपक फुलारी, गौरवमुर्ती अनिता बर्दापूरकर व रामकृष्ण पोत्रेकर यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी महाविद्यालयाच्या वतीने प्रा.अनिता बर्दापूरकर व रामकृष्ण पोत्रेकर दाम्पत्याचा यथोचित सत्कार करण्यात आला. सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांना भेटवस्तू देण्यात आली. यावेळी सर्व मान्यवरांची भाषणे झाली. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने जगायचे कसे हे आम्हाला शिकवले. संस्था व महाविद्यालयाने आलेल्या प्रत्येक संकटात साथ देऊन मदत केली. त्यामुळे मी संस्थेच्या ऋणातून कधीही मुक्त होऊ शकत नाही अशा भावना प्रा. अनिता बर्दापूरकर यांनी व्यक्त केल्या. यावेळी प्रा. विनय राजगुरू, प्रा. डॉ. दिगंबर मुडेगावकर, प्रा. डॉ. रोहिणी अंकुश, प्रा. आशालता कलमे, ऋषिकेश पोत्रेकर, रामकृष्ण पोत्रेकर, रागिणी बर्दापूरकर, जयश्री ईटकुरकर यांनी मनोगते व्यक्त केली. प्राचार्य डॉ. दीपक फुलारी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. मोहिनी वेडे, प्रा. विनय राजगुरू यांनी केले. उपप्राचार्य डॉ. रवींद्र कुंबेफळकर यांनी आभार मानले.

# गटसचिव श्रीधरराव अंडील यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न

किल्लेधारूर दि ३ (प्रतिनिधी)-धारूर तालुक्यातील सेवा सहकारी संस्था मर्यादित तांदळवाडी व धुनकवड या संस्थेचे सचिव श्रीधरराव ज्ञानोबा अंडील हे नियत वयोमानानुसार शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले त्यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा धारूर या ठिकाणी संपन्न झाला. धारूर तालुका गटसचिव संघटना व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा धारूर यांच्या वतीने त्यांचा सोमवार दि २ फेब्रुवारी रोजी धारूर या ठिकाणी सन्मान करण्यात आला ते डिसेंबर १९९५ रोजी सेवा सहकारी सोसायटी या संस्थेत गट सचिव या पदावर सेवेत रुजु झाले.बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्थेच्या आदेशानुसार गट सचिव या पदावर त्यांची नियुक्ती झाली व त्यांनी प्रदीर्घ अशी ३० वर्षाची सेवा सहकार क्षेत्रामध्ये यशस्वीरित्या पूर्ण केली अतिशय मितभाषी, सर्वांचा आदर करणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जातं. कोणालाही कोणतीही अडचण असली तर ती अडचण सोडवण्यासाठी ते प्रयत्नशील असायचे सर्व सचिवाला बरोबर घेऊन जाण्यासाठी त्यांचा प्रयत्न सदैव असायचा त्यांचं वागणं म्हणजे इतरांना आदर्श घेण्यासारखं व्यक्तिमत्व असुन, त्यांच्या संस्थेचं रेकॉर्ड अतिशय अद्यावत ठेवण्या मध्ये त्यांनी कधीही निष्काळजी पणा केला नाही तसेच त्यांनी काही काळ धारूर तालुका देखरेख सहकारी संस्थेमध्ये सहाय्यक सचिव म्हणूनही काम केले त्या ठिकाणी सुद्धा त्यांनी सचिवांवर अतिशय प्रेम करून चांगले काम करून घेतले आणि तालुका नेहमी कामांमध्ये अग्रेसर कसा राहील हे पाहिलं. त्यांच्या संस्थेवर त्यांची प्रतिमा अतिशय सुंदर अशा प्रकारची राहिली आज त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने दि. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा धारूर या ठिकाणी यथोचित सन्मान करण्यात आला. तालुक्यातील सेवा सहकारी संस्था मर्यादित तांदळवाडी व धुनकवड या संस्थेचे सचिव श्रीधरराव ज्ञानोबा अंडील हे नियत वयोमाना नुसार शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले त्यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा धारूर या ठिकाणी संपन्न झाला. धारूर तालुका गटसचिव संघटना व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा धारूर यांच्या वतीने त्यांचा सोमवार दि २ फेब्रुवारी रोजी धारूर या ठिकाणी सन्मान करण्यात आला ते डिसेंबर १९९५ रोजी सेवा सहकारी सोसायटी या संस्थेत गट सचिव या पदावर सेवेत रुजु झाले.याप्रसंगी सहाय्यक निबंधक ऋषिकेश कातळे ,एम आर गव्हाणे (शाखाधिकारी), रमेशराव साखरे (चेअरमन तांदळवाडी), लक्ष्मणराव काळे (चेअरमन धुनकवाड), शाहुराव साखरे (माजी चेअरमन वसंत शिक्षक सहकारी संस्था), संजय आबा चव्हाण (चेअरमन चोरंबा), बाबुराव भोसले (माजी.सरपंच धुनकवाड), तडसकर ( लिपीक सा नि धारुर), गटसचिव श्रीकृष्ण चोले, आशोक रंदवे, विष्णु रंदवे, भारत जाधव केज, संतोष लोंढेकेज, आर्जुन मुंडे, विष्णु पांचाळ, दिनेश गायकवाड, रमेश वाघमोडे, दत्ता मंदे, विष्णु शेरकर, रमेश वाघमोडे, नामदेव मोरे, विजयकुमार करपे, सुरेश गिलबिले, स्वामी यांच्यासह सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते .त्यांनी सेवापुर्ती निमित्त गटसचिव श्रीधरराव अंडील यांना शुभेच्छा दिल्या.

# सेवानिवृत्तीबद्दल मेकॅनिक व चालकाचा आगार व्यवस्थापनाकडून झाला सत्कार

नांदेड दि.३(प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथील एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत हणमंतराव मिसलवाड (३७ वर्षे सेवा) व चालक मुरहारी एकनाथराव सोनकांबळे (चालक क्र.१७९५९) (२७ वर्षे सेवा) बजावून हे दोन कामगार-कर्मचारी वयाचे ५८ वर्षे पुर्ण करून प्रदिर्घ प्रवासी सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल रापम आगार आस्थापनेकडून व आगार कष्टकरी कामगार-कर्मचारी, बंधू-भगिनींच्यावतीने दि.३१ जानेवारी २०२६ शनिवार रोजी सकाळी ठिक ११ वाजता त्यांचा ह्दय सत्कार करून शुभेच्छारूपी निरोप देण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाग नियंत्रक डॉ.चंद्रकांतराव वडसकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून विचारपीठावर विभागीय वाहतुक अधिक्षक तथा प्रभारी आगार व्यवस्थापक मिलींदकुमार सोनाळे, विभागीय सुरक्षा व दक्षता अधिकारी गोविंदराव मुळे, चार्जमन योगेश्वर जगताप, संदीप बोधनकर, आगार लेखाकार सतीश



गुंजकर, हेड कॅशियर गजानन बाबर, वाहतुक निरीक्षक आकाश भिसे, सुधाकरराव घुमे, मयुर तेलंगे, वाहतुक नियंत्रक सुनिल मोरे, पाळी प्रमुख मनोहर माळगे, विनायक चव्हाण, संजय खेडकर, कैलास वाघमारे, सेवानिवृत्त कर्मचारी सत्कारमुर्ती मेकॅनिक गुणवंत एच.मिसलवाड, चालक मुरहारी सोनकांबळे, सौ.मंगलाबाई मुरहारी सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम रापम आगार संयोजन समितीच्यावतीने विचारमंचावरील सर्व मान्यवरांचा शाल, पुष्पहार देवून ह्दय सत्कार करण्यात आला. यावेळी विभाग नियंत्रक डॉ.चंद्रकांतराव वडसकर, विभागीय वाहतुक अधिक्षक तथा प्रभारी आगार व्यवस्थापक मिलींदकुमार सोनाळे, विभागीय सुरक्षा व दक्षता अधिकारी गोविंदराव मुळे यांच्या हस्ते दोन्ही सत्कारमुर्तींचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, प्रवास बॅग, एसटी कामगार कल्याण गौरव समितीच्यावतीने स्मृतिचिन्ह, रोख रक्कम दोन हजार रूपये बक्षीस देवून ह्दय सत्कार करून शुभेच्छा रूपी निरोप देण्यात आला.यानंतर वरील सर्व मान्यवरांचे समयोचित सेवापुर्ती संदर्भाने भाषणे झाली. यावेळी सत्कार मुर्ती गुणवंत एच.मिसलवाड यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाची एसटीचे अधिकारी कर्मचारी व एसटी कर्मचारी कुटुंब उपस्थित होते.

### नामस्मरणाने जीवनाचे कल्याण होते – हभ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा

## गंगनाथवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ

बीड दि ३(प्रतिनिधी)- मनुष्य आयुष्यभर पोटासाठी, लेकरा बाळासाठी खटाटोप करत असतो, हा संसाराचा गाडा ओढत असताना नकळत पाप मनुष्यांच्या हातून होते हे पाप कमी करण्यासाठी संसारी जीवाने नामस्मरण करावे. नामस्मरणाने जीवनाचे कल्याण होते असे गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी उपदेश करताना सांगितले

गंगनाथवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये प्रथम किर्तन रुपी सेवा अर्पण करताना गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांनी जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंग विवेचनात पुढे असे म्हटले की साधुसंतांनी भक्तीचा पाया रचला या संसारी जीवनामध्ये अडकलेल्या माणसा ला मोहमाया रुपी संसारातून परमात्म्याकडे घेऊन जाण्याचा मार्ग दाखवण्याकरिता नामस्मरण हे अतिशय महत्त्वाचे आहे नामस्मरणा चा महिमा सांगताना नामस्मरणाने वाल्याचा वाल्मिकी होतो ; जगामध्ये असा कोण आहे की तो नामस्मरणामुळे वाया गेला आहे ? असा जगात कोणीही नाही ; नामस्मरणाने संसारी जीवाचे कल्याणच होते . असे नमूद केले. यावेळी पंचक्रोशी तील टाळकरी माळकरी विणेकरी मृदंगाचार्य गायनाचार्य भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये कीर्तन संपन्न झाले

# लाडक्या बहिणींच्या ई-केवायसीसाठी अंगणवाडी सेविकांचा बहिष्कार !

## पाटोदा तालुक्यात १८८ अंगणवाड्यांचा निर्णय; 'योजनाबाह्य कामे नकोत' ठाम भूमिका

पाटोदा (प्रतिनिधी) : एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत (ICDS) कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना त्यांच्या मूळ कामांव्यतिरिक्त दिली जाणारी अतिरिक्त, योजनाबाह्य कामे थांबवावीत, असे स्पष्ट निर्देश केंद्र सरकार, महिला व बालविकास विभाग तसेच माननीय सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिले असतानाही प्रत्यक्षात मात्र अंगणवाडी सेविकांवर सतत अतिरिक्त कामांचा बोजा टाकला जात असल्याचा आरोप होत आहे. याच पार्श्वभूमीवर 'लाडक्या बहिणी' योजनेच्या ई-केवायसी संदर्भातील सर्वे, पडताळणी व संबंधित अतिरिक्त कामांना पाटोदा तालुक्यातील अंगणवाडी सेविकांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

पाटोदा नगरपंचायत हद्दीतील १९ अंगणवाड्या तसेच पाटोदा तालुक्यातील ग्रामीण भागातील १६९ अंगणवाड्या, अशा एकूण १८८ अंगणवाड्यांमधील सेविकांनी हा सामूहिक निर्णय घेतला असून, अंगणवाडी कृती समितीच्या वतीने अधिकृत बहिष्कार जाहीर करण्यात आला आहे.

**'मूळ कामावर परिणाम'**

अंगणवाडी सेविकांच्या म्हणण्यानुसार, त्यांचे मुख्य कर्तव्य म्हणजे लहान मुलांचे शिक्षण, पूरक पोषण आहार वितरण, गर्भवती व स्तनदा मातांची काळजी, आरोग्य तपासणी, गृहभेटी आदी आहेत. साधारणपणे अर्ध्या दिवसाहून अधिक वेळ अंगणवाडी केंद्रात कामकाज चालते, त्यानंतर किमान एक तास गृहभेटींसाठी राखीव असतो. अशा परिस्थितीत शासनाच्या विविध योजनांतील सर्वेक्षणे, पडताळण्या, ई-केवायसीसारखी कामे अंगणवाडी सेविकांवर लादली जात असल्याने मुलांच्या पोषण व शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**शासन आदेशांकडे दुर्लक्ष ?**

केंद्र सरकारच्या महिला व बालविकास विभागाने तसेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार अंगणवाडी सेविका, मदतनीस व पर्यवेक्षक यांना खउऊड योजनेबाह्य कामांसाठी वापरू नये, असे स्पष्ट नमूद आहे. निवडणुका, सर्वेक्षणे, इतर योजनांतील पडताळणी यामुळे अंगणवाडी सेविकांवर अतिरिक्त ताण येतो आणि त्याचा थेट परिणाम बालकांच्या पोषण निर्देशांकांवर – कुपोषण, कमी वजन, खुंटलेली वाढ यावर होतो, असेही आदेशांमध्ये नमूद आहे. तरीदेखील प्रत्यक्षात या सूचनांचे पालन होत नसल्याचा आरोप कृती समितीने केला आहे.

**'ई-केवायसीचे काम नाही'**

याच कारणामुळे लाडक्या बहिणी योजनेच्या ई-केवायसी संदर्भातील कोणतेही सर्वेक्षण, पडताळणी किंवा संबंधित काम करण्यास नकार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा बहिष्कार योजनाविरोधी नसून, योजनाबाह्य कामांविरोधातील आंदोलन असल्याचे सेविकांनी स्पष्ट केले.

# आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी जिद्दीने यशस्वी व्हा-ॲड.सुरेश हात्ते



तलवाडा दि.३ (प्रतिनिधी) : मेहनत आणि कठीण परिश्रमाने मन लावून अध्ययन करून आपल्या आई – वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी जिद्दीने यशस्वी झाले पाहिजे. ज्यामुळे आपल्या गावाचे, आई – वडिलांचे आणि महाविद्यालयाचे नाव मोठे होईल असे प्रतिपादन इयत्ता बारावी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य ड.सुरेशराव हात्ते यांनी केले. यावेळी व्यासपीठावर तलवाडा पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक कैलास अन्नलदास, अट्टल महाविद्यालयाचे प्रा.शरद सदाफुले, माजी सरपंच राधाकिसन शिंगणे, डॉ.नितीन काकड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील त्वरितापूरी कला व विज्ञान महाविद्यालयात बारावी वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्यासाठी निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्या येणाऱ्या काळात त्यांना शैक्षणिक क्षेत्रात यश मिळावे अशा शुभेच्या आपल्या मनोगतातून पोलिस उपनिरीक्षक कैलास अन्नलदास, प्रा. शरद सदाफुले, डॉ. राम धुमक, पत्रकार तुळशीराम वाघमारे, पत्रकार आर.आर.बहीर यांनी दिल्या. यावेळी बोलताना ड.हात्ते म्हणाले की बारावी परीक्षेचा काळ हा सर्वात कठीण परंतु तितकाच आयुष्याला कलाटणी देणारा काळ मानला जातो. या कालावधीत विद्यार्थ्यांनी आपल्या आई – वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न केले पाहिजे. आपल्या आई-वडिलांचे नाव मोठे होईल यासाठी मेहनत घेतली पाहिजे. आपले जीवन सुखकर कसे होईल याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगून सर्व विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्य शेख खलीलभाई, पत्रकार विष्णू राठोड, खतीब कदीर, बाबूराव शिंगणे, नन्नावरे, प्राध्यापक भारत चव्हाण, चोरमोले, मदन पवार, विजय हातागळे यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दैनिक 'पार्श्वभूमी'तील विशेष लेखाचे आ.सुरेश धस यांच्याकडून विशेष कौतुक



पाटोदा (प्रतिनिधी) : दिनांक २ फेब्रुवारी रोजी आ.सुरेश धस यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त दैनिक पार्श्वभूमीमध्ये प्रकाशित झालेल्या विशेष लेखाचे आमदार सुरेश धस यांनी मोकळ्या मनाने कौतुक केले. या लेखामध्ये आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघात मागील एक वर्षात आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून १३५ गरजू व गोरगरीब रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, सिद्धिविनायक ट्रस्ट, महात्मा फुले जन आरोग्य योजना तसेच इतर शासकीय योजनांमधून एक कोटी रुपयांहून अधिकची वैद्यकीय मदत कशी मिळवून देण्यात आली, याची सविस्तर आकडेवारी व सखोल विश्लेषण मांडण्यात आले होते.

पत्रकार महेश बेदरे यांनी तयार केलेला हा विशेष लेख २ फेब्रुवारी रोजी प्रकाशित झाला होता. श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे आमदार सुरेश धस यांनी हा लेख संपूर्ण वाचून दैनिक पार्श्वभूमीचे आभार मानले. तसेच अशा प्रकारच्या वास्तववादी, आकडेवारीवर आधारित लेखनामुळे जास्तीत जास्त गरजू रुग्णांपर्यंत शासकीय योजनांची माहिती पोहोचून रुग्णसेवेला निश्चितच बळ मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.याप्रसंगी पत्रकार महेश बेदरे, पाटोदा पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांच्यासह अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते.

# पाणलोट व्यवस्थापनासाठी युवकांचा सहभाग-नवनाथ थोटे

नेकनूर (प्रतिनिधी) : माऊली विद्यापीठ केज संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शास्वत विकास पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकासासाठी युवा विशेष निवासी शिबिर दिनांक २८ जानेवारी २०२६ ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये मौजे सफेपुर ता. जि. बीड या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. सदरील शिबिराचा समारोप आज दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाले या समारोपाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. हे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माऊली विद्यापीठ केजचे कोषाध्यक्ष श्री नवनाथरावजी थोटे हे उपस्थित होते तसेच सफेपुर गावचे सरपंच माधव आहेर उपसरपंच विष्णू मेंगडे, माजी सरपंच शहाजी घोडके व जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक साळुंखे हे उपस्थित होते. सुरुवातीला आलेल्या पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले व स्वागत गीत विद्यार्थिनी आकांक्षा आव्हाड हिने गायले कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक श्री नवनाथराव थोटे यांनी असे सांगितले की, पडीत जमिनी पाणलोट क्षेत्राखाली आणण्यासाठी युवकांनी प्रयत्न केले पाहिजे व जास्तीत जास्त समाज उपयोगी त्या जमिनीचा वापर कसा करता येईल याचा आपण विचार केला पाहिजे या मधूनच देशाचा विकास आपणाला साथ येईल. व महात्मा गांधीजींनी खेड्याकडे चला असे म्हटले होते ते आज पडीक जमिनी पाणलोट क्षेत्राखाली आणून सामाजिक विकास करण्यासाठी उपयोगी पडेल हे याद्वारे महात्मा गांधींचे विचार तंतोतंत उतरत आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. इनकर व्ही.एस. यांनी केले तर याचे सूत्रसंचालन रासेयो. कार्यक्रमाधिकारी प्रा. रामरूले डी.के. यांनी केले याचे आभार प्रा. मुजावर एस.टी. यांनी केले या कार्यक्रमासाठी प्राध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच युवक व युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपळनेर भागात कांद्याला फटका



## फवारणीचा खर्च वाढला

पिंपळनेर (प्रतिनिधी) : बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात सततच्या ढगाळ वातावरणामुळे कांदा पिकांवर मात्रा व करपा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे महागडी औषधे फवारणी करावी लागत आहेत. परिणामी उत्पादन खर्चात वाढ होत असल्याने शेतकरीवर्गातून चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या अनेक गावांमध्ये बारमाही पाणी उपलब्ध असल्याने बीड तालुक्यात सुमारे एक हजार हेक्टर कांदा लागवड झाली आहे. अधिक पैसा मिळवून देणारे नगदी पीक म्हणूनही शेतकरी कांद्याकडे आकृष्ट होत आहेत. मागील वर्षांची तुलना करता यावर्षांत कांदापिकाचे चांगले पैसे झाले, मागील वर्षी शेतकऱ्यांना हजारों रुपयांचा तोटाही सहन करावा लागला आहे.आता सततच्या ढगाळ वातावरणामुळे माया रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. शेतक-यांना विविध कंपन्यांची औषधे वाढीव किंमतीवर घ्यावी लागत असल्याने शेतकयांना नाहक खर्च करावा लागत आहे. योग्य औषधांच्या नियोजनासाठी कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यंदा कांदा लागवडीसाठी रोपांची टंचाई मोठ्या प्रमाणात होती. लागवडीसाठी मजूर मिळत नव्हते . शेतकऱ्यांनी भांडवली खर्च करून कांदा लागवडी पूर्ण केल्या आहेत. विक्रीयोग्य कांदा उत्पादन मार्चनंतर मोठ्या प्रमाणात होणार आहे. काढणीला आलेला कांदा बाजारात विक्रीसाठी आला तर भाव कोसळतील, असे अडतदार सांगत आहेत . त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेले कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत.

## शासकीय कार्यालयात

# दुचाकी चालक अधिकारी व कर्मचारी यांनी हेल्मेट परिधान करणे

बीड दि. ०३ (जिमाका ): - मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ मधील तरतुदीनुसार दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. याबाबत वेळोवेळी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ नुसार दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेट सक्तीचे आहे असे निर्णय देण्यात आलेले आहेत.

हेल्मेट वापरण्याबाबत याआधीही सुचित करण्यात आले होते पण हेल्मेटचा वापर झाल्याचे दिसुन येत नाही.बीड जिल्हयातील सर्व शासकीय आस्थापना, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद येथे काम करणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी दुचाकी वाहनाने शासकीय कार्यालयात येताना तसेच सार्वजनिक रस्त्यावर दुचाकी वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करण्यात यावा व जिल्हा रस्ता सुरक्षा समितीस बीड जिल्हा अपघात मुक्त करण्यास मदत करावी. उपरोक्त बाब आपल्या अधिनस्त सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व दुचाकी वाहन चालविणा-या अधिकारी / कर्मचा-यांवर सर्व विभाग प्रमुख यांनी व्यवस्थापकीय नियंत्रण ठेवण्यात यावे व तसा अनुपालन अहवाल सादर करावा.असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

# कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी राहुल सूर्यतळ यांची बीड बदली रद्द करा-सय्यद सलिम



माजलगाव दि.३ (प्रतिनिधी ) माजलगाव येथील कर्तव्यदक्ष व जनतेत विश्वास निर्माण करणारे पोलीस अधिकारी राहुल सूर्यतळ यांची बीड येथे करण्यात आलेली बदली तात्काळ रद्द करून त्यांना पुन्हा माजलगाव येथेच पदस्थापना द्यावी, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते,तथा आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलिम यांनी केली आहे.दरम्यान जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची शिष्टमंडळाद्वारे भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी माजलगाव शहरात लोकाभिमुख अधिकारी म्हणून काम केले. कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवत त्यांनी शहराला शिस्त लावण्याचे काम केले.गुन्हेगारीवर कडक कारवाई केली. सर्वसामान्य नागरिक,व्यापारी वर्ग आणि युवकांमध्ये त्यांनी विश्वासाचे वातावरण निर्माण केले होते.त्यांच्या कार्यकाळात अवैध धंदे, दहशत आणि गुन्हेगारी प्रवृत्तीवर मोठ्या प्रमाणात लगाम बसल्याचे नागरिकांनी अनुभवले आहे.आशा चांगल्या अधिकाऱ्याला लाच प्रकरणाशी संबंध जुळवत राजकारणाचा बळी करून त्यांची बदली करण्यात आली आहे. शहरातील नागरिक आशा प्रामाणिक कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यासाठी नेहमीच प्रोत्साहन देत असून या मागणीला नागरिक,व्यापारी व विविध सामाजिक घटकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. दरम्यान माजलगावला अशाच धडाडीच्या अधिकाऱ्यांची गरज आहे, असे मत सलिम यांनी व्यक्त करत लवकरच शिष्टमंडळाद्वारे पोलीस अधीक्षक यांची भेट घेणार असून,राहुल सूर्यतळ यांची बीड बदली रद्द करून त्यांना पुन्हा माजलगाव शहर पोलीस स्टेशनचा पदभार द्यावा अशी विनंती सादर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.




# सौ.के.एस.के. महाविद्यालयात शाकीर मोईन व्याख्यानमाला उत्साहात संपन्न

बीड (प्रतिनिधी): येथील नवगण शिक्षण संस्था संचलित सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली शाकीर मोईन व्याख्यानमाला नुकतीच मोठया उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमात भारतीय धर्मनिरपेक्षता आणि भारतीय लोकशाही समोरील आव्हाने या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमासाठी संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर तसेच संस्थेच प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वंभर देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे प्रेरणास्त्रोत काकू आणि नानांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन झाली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक लोकप्रशासन व राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. पल्लवी इरलापल्ले यांनी केले. त्यांनी प्रस्ताविकात व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. याकार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते . व्याख्यानमालेतील पहिले पुष्प गुंफताना मिल्लीया महाविद्यालयाचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ. अब्दुल अनिस अब्दुल रशिद यांनी भारतीय धर्मनिरपेक्षता या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय धर्मनिरपेक्षतेचे समकालिन संदर्भात यथार्थ वर्णन केले आणि सद्यस्थितीत सामाजिक एकोप्यासाठी त्याचे महत्व पटवून दिले. त्यानंतर दुसरे पुष्प गुंफताना बलभीम महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रविंद्र काळे यांनी भारतीय लोकशाही समोरील आव्हाणे या विषयावर सखोल मांडणी केली. त्यांनी लोकशाही व्यवस्थेसमोर आज उभे असलेले सामाजिक आव्हाणे ज्यामध्ये जातीवाद व धर्मवाद राजकीय आव्हाणे, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, आर्थिक आव्हाणे, बेरोजगारी, गरिबी, प्रशसकीय आव्हाणे, भ्रष्टाचार यासाख्या असंख्य समस्या मांडल्या आणि या समस्येवर मात करण्यासाठी व लोकशाही बळकट करण्यासाठी निवडणुकीतील तरुणांचा सहभाग अत्यंत महत्वाचा असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. खान ए.एस. यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राज्यशास्त्र विभागाचे डॉ. संजय मोरे, ऊर्दु विभागाचे डॉ. इमामोद्दिन सय्यद, अर्थशास्त्र विभागाचे डॉ. अभिजीत आघाव, इतिहास विभागाचे डॉ. संजय काळे, शारिरीक शिक्षण विभागाचे डॉ. शकील शेख यांनी परीश्रम घेतले.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.एम.ए.शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दि.अर्ज ४५/२०२६ रेखा व इतर विरुध्द निरंक मार्फत : ॲड.एस.एस.बेदरे

**अर्जदार :** १) रेखा भ्र. सुरेश गायकवाड, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, २) सुरेखा भ्र. सदाशिव गायकवाड, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम. ३) हिराबाई भ्र. वाजिराव मोरे, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम. ४) मिलन भ्र. विजय अवघडे, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम,

अर्जदार क्र. १ रा. आशिर्वाद कॉलनी, भैरोबाचा पायथा गडकर, ता.जि. सातारा, अर्जदार क्र. २ रा. मानेवस्ती, वनवासवाडी कृष्णनगर, खेड, ता. जि. सातारा, अर्जदार क्र. ३ रा. घर ६०३/५, गल्ली ३, लक्ष्मीनगर, भवानी माता मंदिरासमोर, पुणे शहर, कोंढवा बु. जि. पुणे. अर्जदार क्र. ४ रा. अण्णाभाऊ साठे नगर, केम, सोलापूर.

विरूध्द निरंक

**मागणी अर्ज:** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार क्र.१ ते ४ यांनी या न्यायालयात मयत **सत्यभामा भ्र. रघुनाथ अडागळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **सत्यभामा भ्र. रघुनाथ अडागळे** यांचा मृत्यु दिनांक १४/१०/२०२४ रोजी पाटोदा ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र.१ ते ४ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताने वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत **सत्यभामा भ्र. रघुनाथ अडागळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची

**पुढील तारीख दि. ११ मार्च २०२६**

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.स्तर, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड.

क.लिपीक

## जाहीर प्रगटन

बीड जिल्ह्यातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार १. सुनिल सुभाष बोबडे, रा. रहेमतीया मस्जीद समोर, बीड ता.जि. बीड २. अजित कल्याण घोडके, रा. डॉ. मोटे हॉस्पीटल जवळ, डी. पी. रोड, बीड ता. जि. बीड ३. उमेश निवृत्ती घायतिडक, रा. उमरी (बु) ता. माजलगांव जि. बीड, ४. लखमावाड अभिजीत पोतन्ना, रा. गुजराथी कॉलनी, टिळक नगर, धर्माबाद जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारावरून या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की.

१. श्री. प्रताप आत्माराम जोगदंड, रा. जिजाऊ नगर, बार्शी रोड, बीड ता.जि. बीड २. नामदेव बन्सी केदार, रा. जिजाऊ नगर, बार्शी रोड, बीड ता. जि. बीड, ३. अंगद बाबुराव नवले, रा. रुई ता. गेवराई जि. बीड ४. राम बापुराव नवले, रा. रुई ता. गेवराई जि.बीड ५. बाबासाहेब उध्दवराव भवर, रा. चाणक्यपुरी, बीड ता. जि.बीड ६. तुकाराम प्रल्हाद गव्हाणे, रा. पारगांव सिरस ता.जि.बीड यांचे मालकी व ताब्यातील र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.व ता. बीड र.डी.जि.प.बीड डि.पं.स.ता.व बीड कसबे बीड तरफ खोड येथील नगर परिषद हद्दीचे बाहेरील सर्व्हे नं. १०१/अ मधील प्लॉट क्रं. १ पैकी ज्यास ग्रामपंचायत कार्यालय. आनंदवाडी मालमत्ता क्रं. जुना ७३९/१ व नवा ७३९/१८ असा मिळालेला आहे. सदर प्लॉट हा त्रिकोणी असल्यामुळे ज्याचे एकुण क्षेत्रफळ ७०.४५ चौ. मी. आहे. तसेच कसबे बीड तरफ देशमुख येथील नगर परिषद हद्दीचे बाहेरील सव्र्हे नं. ३१ मधील प्लॉट ज्यास ग्रामपंचायत कार्यालय, आनंदवाडी मालमत्ता क्रं. ८०२ असा मिळालेला आहे. ज्याची लांबी दक्षिण-उत्तर पुर्व बाजु-५२.९० मीटर व पश्चिम बाजु-५७.७५ मीटर व रुंदी पुर्व-पश्चिम दक्षिण बाजु-१२.५० मीटर व उत्तर बाजु-२७.६५ मीटर आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ १००० चौ.मी. आहे. सदरचे दोन्ही प्लॉटचे एकत्रीत एकूण क्षेत्रफळ ११५१८ चौ.फुट आहे. मालमत्ता क्रं. ७३९/१८ पैकी ची चतुः सिमा पुर्वेस-नवले व ईतर, पश्चिमेस : सॉ मिल, दक्षिणेस : ७.६२ मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस-नवले व इतर तसेच मालमत्ता क्रं. ८०२ पैकी ची चतुः सिमा पुर्वेस-९ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस सर्व्हे नं. १०१ लागुन सॉ मील, दक्षिणेस-७.६२ मीटर रस्ता व जोगदंड व केदार यांचा प्लॉट व उत्तरेस-२० मीटर रुंदीचा रस्ता.

येणे प्रमाणे वर नमुद चतुः सिमेतील मिळकत खरेदी करण्याचा व्यवहार आमच्या अशिलाने वर नमुद प्लॉट मालकांसोबत केलेला असुन त्यांनी आमचे पक्षकारांचे हक्कात ईसारपावती करुन दिलेली आहे. सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत लवकरच करण्याचे ठरले आहे. सदरच्या मिळकती या निर्विवाद असल्याचे वर नमुद मालकांनी आमचे पक्षकारांना सांगितलेले आहे. तसेच आमचे पक्षकार किंवा ते सांगतील त्या व्यक्तींचे हक्कात नोंदणीकृत खरेदीखत करुन देण्याचे ठरले आहे.

तरी सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भात कोणाचे काही हितसबंध, वाटणी, गहाणखत, कर्ज व देवाण घेवाण, चोळीबांगडी, कोर्ट वाद अथवा इतर हक्क असेल तर सबळ पुराव्यानिशी ०७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर संपर्क साधावा व उजरदारी करावी कोणाचाही मुदतीत आक्षेप अथवा उजर आला नाही तर वर नमुद मिळकतीचे खरेदीखत आमचे अशिल करुन घेतील त्यानंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरुन खरेदीखत करुन घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटण.

दिनांक :-३१/०१/२०२६.

**जाहीर प्रगटन देणार क्रं. १ ते ४ मार्फत**

**सुनिल सुभाष बोबडे,**
रा.रहेमतीया मस्जीद समोर,
बीड ता.जि.बीड
मो.नं.९७३०९३९१४२/९४०३६४०९४८

मार्फत :
**ॲड.शेख अस्लम आरेफ**
जिल्हा व सत्र न्यायालय,बीड
मो.नं. ९८०९३७६३७६

16529

# पार्श्वभूमी



## ॲड.सुरेश हात्ते यांना मातृशोक

तलवाडा दि.३ (प्रतिनिधी) :- माजी जि.प.सदस्य तथा भाजपाचे नेते



ॲड.सुरेश ज्ञानोबा हात्ते व माजी पं.स.सदस्य - प्रकाश ज्ञानोबा हात्ते यांच्या मातोश्री गं.भा.रूक्मीणबाई ज्ञानोबा हात्ते यांचे मंगळवारी दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास निधन झाले असून मृत्यूसमयी त्यांचे १०२ वर्षे इतकेहोते. अतिशय मनमिळाऊ व सुस्वभावी म्हणून त्या सर्वपरिचित होत्या. त्यांचा अंत्यविधी आज बुधवार दि.०४ फेब्रुवारी रोजी सकाळी ठिक १० वाजता होणार आहे.

पान २ वर

## चव्हाण युवराज सर सेवानिवृत्त

बीड दि ३ (प्रतिनिधी)- तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उ.माध्यमिक विद्यालयातील सहशिक्षक चव्हाण युवराज सर सेवानिवृत्त झाले. यावेळी त्यांना समारंभपर्वक निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महादेवराव काळे (अण्णा), प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक मुकुंदराव काळे, प्राचार्य तथा सचिव अमोल काळे सर, अशोकराव पांढरे, श्री विनायक ढास सर, श्रीमती सोजरबाई काळे, सटवाजी कोठुळे (मेजर), नगरसेवक अक्षय जाधव, डॉक्टर साळवे, फौजी पांडुरंग चव्हाण, दत्ता गोरे, घुगे सर (उद्योजक),

पान २ वर

# प्रत्येक परीक्षा केंद्रातील वर्गात सिसीटिव्ही, कॅमेरे नसल्यास पर्यवेक्षक, कर्मचाऱ्यांची अदलाबदल

## बीड जिल्ह्यात दहावी, बारावीच्या परीक्षांसाठी १४ भरारी पथके



– बीड दि.३ प्रतिनिधी–

**जिल्ह्यात राज्य मंडळामार्फत होणाऱ्या १० वी आणि १२ वी च्या परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ करीता प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. १० वी, १२वी च्या परीक्षा कॉफीमुक्त वातावरणात व्हावेत यासाठी १४ भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या परीक्षांवर चार ड्रोन कॅमेऱ्यांची नजर राहणार असुन परीक्षा केंद्रातील प्रत्येक वर्गखोलीमध्ये सिसीटिव्ही कॅमेरे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या ठिकाणी सिसीटिव्ही नसतील तेथील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित इतर कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यात येणार आहे.**

बीड जिल्ह्यात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र म्हणजेच १२ वीच्या परीक्षा दि.१० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होत आहेत. तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र म्हणजेच १० वी च्या परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. कॉफीमुक्त अभियानांतर्गत कार्यवाहीसाठी प्रशासन सतर्क झाले आहे. जिल्हास्तरावर दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीत पोलीस अधिक्षक, सीईओ, वीज कंपनीचे कार्यकारी अभियंता, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, शिक्षणाधिकारी प्राथमिक, योजना हे सदस्य असणार आहेत. तर शिक्षणाधिकारी माध्यमिक सदस्य सचिव आहेत. त्याअनुषंगाने दि.३ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीस सर्व सदस्य उपस्थित होते. त्याचबरोबर दुरचित्रप्रणालीद्वारे सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी बैठकीला उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक परीक्षाकेंद्रावरील वर्ग खोलीत सिसीटिव्ही कॅमेरे बसवुन ते कार्यान्वीत करावे, संवेदनशील परीक्षाकेंद्रावर आवाजाचे रेकॉर्डींग होणारे सिसीटिव्ही कॅमेरे बसवावेत. त्याची तपासणी तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी पुढील दोन दिवसात करून त्याचा अहवाल दोन दिवसात सादर करावा. सिसीटिव्ही कॅमेरेचे ॲक्सेस जिल्हास्तरावर कंट्रोल रूम स्थापन करून घेण्यात यावे. संवेदनशील परीक्षा केंद्रावर आणि ज्या वर्ग खोल्यामध्ये सिसीटिव्ही कॅमेरे नसतील तर तेथील कर्मचारी, अधिकाऱ्यांची अदलाबदल करावी. परीक्षाकेंद्रावर नियुक्त कर्मचाऱ्याव्यतिरीक्त इतर कर्मचारी तसेच व्यक्तींना प्रवेश देऊ नये. अशा सुचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. परीक्षा कालावधीत १० वी,

पान २ वर

## बीडच्या पालकमंत्रीपदी सुनेत्राताई पवार

# जनतेच्या अपेक्षांना न्याय देणारी निवड-आ.सुरेश धस

पाटोदा दि.३(प्रतिनिधी):- बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजित पवार यांची नियुक्ती ही जनतेच्या अपेक्षांना न्याय देणारी ठरेल, असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला आहे. प्रभावी नेतृत्व, धाडसी निर्णयक्षमता आणि लोकाभिमुख दृष्टिकोनाच्या बळावर त्या बीड जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देतील, असेही त्यांनी म्हटले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघातातील निधनानंतर राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी सुनेत्राताई पवार यांचा शपथविधी झाला. यापूर्वी बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद अजितदादा पवार यांच्याकडे असल्याने, हे पद सुनेत्राताई पवार यांच्याकडेच द्यावे, अशी मागणी विविध स्तरांतून पुढे येत होती. त्या अनुषंगाने मंगळवार, दिनांक ३ फेब्रुवारी रोजी सुनेत्राताई पवार यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती

पान २ वर

## भागवत भक्त पारायण नंदकुमार महाराज ज्ञान, भक्ती, वैराग्याचे मूर्तिमंत संत पुरुष

## एकसष्टी निमित्ताने राम कथेचे आयोजन

बीड (प्रतिनिधी )आनंदीदायी आणि एक गौरवाचा सोहळा संगीत राम कथेचे आयोजन बुधवार ४



फेब्रुवारी पासून नंदकुमार महाराज रामदासी यांच्या एकसष्ठी निमित्ताने केले आहे. भगवत भक्ती परायण श्री नंदकुमार महाराज केवळ कथावाचकच नाहीत तर शुद्ध आचरण असणारे आहे, त्यांचे जीवन पवित्र आहे, ज्ञान, भक्ती, वैराग्याची ते मूर्तीमंत संत पुरुष आहेत.

प्रभू श्रीरामचंद्रांना आपले आराध्य दैवत मानून त्यांच्याच कृपेने संस्कृतीचे संरक्षण करत आहेत. श्री नंदकुमारमहाराज रामदासी यांनी जवळजवळ आठशे कथेंचे निरूपण त्यांनी आत्ता पर्यंत केले आहे. त्या कथेंच्या माध्यमातून त्यांनी वैदिक ज्ञान, हिंदू धर्म, सनातनाचा प्रचार - प्रसार त्यांनी केला. भारतामध्ये प्रसिद्ध असणाऱ्या रामदासी परंपरेमध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांच्या माध्यमातून संस्कृतीचे संरक्षण, ज्ञान परंपरांचे संरक्षण झाले. वेळोवेळी आपल्या शास्त्रांचा महिमा त्यांच्या कडून सांगितला जातो. वेद, उपनिषदे स्मृती ग्रंथ, रामायण, महाभारत भागवत पुराण यामुळे तर संस्कृती टिकून

पान २ वर

## समीर काझी यांच्या दुसऱ्या कन्येचाही साखरपुड्यातच विवाह सोहळा



बीड : महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे तरुण, तडफदार अध्यक्ष समीर काझी यांची ज्येष्ठ कन्या नूरूलइमान यांचा ४ जानेवारी २०२६ रोजी साखरपुड्यातच बीड येथे आदर्श विवाह सोहळा संपन्न झाल्यानंतर रविवार, दि.१ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर व सर्व समाजबांधवांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे त्यांची कनिष्ठ

पान २ वर

## कै.विठ्ठलराव सरवदे यांचा पुण्यतिथी सोहळा संपन्न

# ग्रामस्थांनी ईतर कार्यक्रमांना टाळून गावातील शाळेला मदत करून सर्वगुण संपन्न शाळा करावी-माजी आ.सोळंके

माजलगाव, दि. ३ प्रतिनिधी : गावक-यांनी अखंड हरिनाम सप्ते, कथा, पोत्या, किर्तनें अशा कार्यक्रमांच्या खर्चाला फाटा देत गावातील जिल्हा परिषद असो कि संस्थांच्या शाळा असोत त्या शाळेला देवीदेवतांच्या मंदिरांप्रमाणे शाळांना विद्यामंदिर करत सर्वोतोपरी मदत करत शाळा सर्वगुण संपन्न कराव्यात असे आवाहन माजी आमदार मोहनराव सोळंके यांनी करत स्वतः लवुळ येथील जिल्हा परिषद शाळेला साडेपाच हजार रुपये आर्थिक मदत व एक संगणक संच भेट देणार असल्याचे जाहिर केले.

कै. विठ्ठलराव सरवदे यांच्या पुण्यतिथी सोहळ्यात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. काल २ फेब्रुवारी २०२५ या दिवशी कैलासवासी विठ्ठलराव तात्याबा सरोदे यांच्या सोळाव्या पुण्यस्मरण निमित्त त्यांचे चिरंजीव बबनराव सरोदे साहेबराव सरवदे छगन दादा

पान २ वर



## राजस्थानी माध्यमिक विद्यालय सहयोग नगर शाळेचा विद्यार्थी

## पृथ्वीराज राणे यास नॅशनल अवॉर्ड जाहीर



बीड दि.३ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद अशी कामगिरी राजस्थानी माध्यमिक विद्यालय सहयोग नगर शाळेचा विद्यार्थी चि. पृथ्वीराज भाऊसाहेब राणे याने सीट कव्हर फॉर टू व्हीलर या उपयुक्त व नाविन्यपूर्ण संशोधन संकल्पनेस डॉ. ए पी जे अब्दुल कलाम स्मरणार्थ दरवर्षी देशभरातील 'दहा वैज्ञानिकांना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशन हनी बी नेटवर्क आणि डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जातो. यामध्ये पृथ्वीराज राणे याला द्वितीय क्रमांक मिळाला. डॉ. ए पी जे अब्दुल कलाम स्मृतीचिन्ह संशोधन प्रोटो टाईप साठी आर्थिक मदत पेटंट रजिस्ट्रेशन तसेच तयार उत्पादन बाजारात आणण्यासाठी स्टार्ट अप इंडिया च्या माध्यमातून संपूर्ण अर्थसाह्य भारत सरकार तर्फे दिले जाणार आहे लवकरच हा पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे पुरस्काराची घोषणा नुकतीच ऑनलाईन पद्धतीने भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर आणि हनी बी नेटवर्कचे संस्थापक अध्यक्ष प्रो. अनिल गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आली.

पृथ्वीराज राणे याचे कौतुक म्हणून म्हणून शाळेमध्ये सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष राजस्थानी सेवा समाज संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र मुनोत, सचिव रामेश्वर कासट, संचालक अशोक मंत्री उपस्थित होते. कासट सरांनी मुलांना आपल्या ज्ञानाच्या जोरावर विविध प्रयोग करावेत तसेच वैज्ञानिक क्षेत्रांमध्ये उंच भरारी घ्यावी आणि आपल्या शाळेचे नाव असेच उंच पथावर न्यावे वअशा मुलांपासून इतरांनीही प्रेरणा घेऊन नविन शोध लावावेतअसे मार्गदर्शन केले. तसेच सर्व मान्यवरांनी विद्यार्थी व शाळेतील सर्व शिक्षकवृंदांनी पृथ्वीराज राणे यांचे खूप खूप कौतुक केले. व शाल बुके देऊन त्याचा सत्कारही करण्यात आला. यावेळी प्रतिक्रिया देताना पृथ्वीराजने पुरस्कार मिळवणे माझे स्वप्न होते आणि मिसाइल मॅन डॉ.ए पी जे अब्दुल कलाम यांच्या नावाने मला हा पुरस्कार मिळणे हे माझे खूप मोठे भाग्य समजतो आणि देशभरातून आलेल्या लाखो संशोधन

पान २ वर

## प्रियदर्शनी कन्या प्रशाला पाटोदा येथे इंग्लिश ऑलिंपियाडमधील यशाबद्दल विद्यार्थिनींचा गौरव

पाटोदा- पाटोदा येथील प्रियदर्शनी कन्या प्रशाला येथील विद्यार्थिनींनी इंग्लिश ऑलिंपियाड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेचे नाव उज्वल केले आहे. इयत्ता सहावीतील साक्षी सुशेन नागरगोजे, रेणुका महेश बेदरे,



आनम मेहबूब पठाण तसेच इयत्ता आठवीतील अक्षरा नितीन जाधव यांनी इंग्लिश ऑलिंपियाडमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत गोल्ड मेडल व प्रमाणपत्र मिळवले. या उल्लेखनीय यशाबद्दल प्रियदर्शनी कन्या

पान २ वर

## पिंपळनेर परिसरात गहू परिपक्व

पिंपळनेर दि ३ (प्रतिनिधी)-बीड तालुक्यातील पिंपळनेर भागात रब्बी हंगामातील गहू पीक सध्या परिपक्व अवस्थेत आले असून, पिकांची वाढ समाधानकारक झाली आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत झालेल्या अवकाळी पावसामुळे यंदा रब्बी हंगामातील गहू व हरभऱ्याची पेरणी उशिरा झाली होती. मात्र, प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत शेतकऱ्यांनी गहू व हरभऱ्याची लागवड यशस्वीपणे केली. मोकळ्या झालेल्या शेतजमिनीत शेतकऱ्यांनी गहू व हरभऱ्याची लागवड केली आहे. गेल्या दोन महिन्यांतील तीव्र थंडीचा गहू व हरभरा पिकांना मोठा फायदा झाला असून, पिकांची वाढ जोमात होताना दिसत आहे. पूर्व भागात ऊसाची शेती मोठ्या प्रमाणात केली जात असली, तरी घरगुती वापरासाठी धान्योत्पादनाकडेही शेतकऱ्यांचा कल आहे. जवळा, नाथापूर, रंजेगाव, आडगाव, ताडसोन्ना, घाटसावळी, मन्यारवाडी, गुंदावडगाव, ईट, आदी परिसरात गहू व हरभरा पिके बहरली असून, थंडीमुळे कणसांची भर चांगली झाली आहे. सध्या गहू व हरभरा धान्याचे बाजारभाव वाढले असल्याने शेतकऱ्यांना यंदा या पिकांतून चांगले उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

# ना.पंकजाताई यांच्या लातूर जिल्ह्यात झंझावाती प्रचार सभा

## केंद्र व राज्याप्रमाणेच जिल्हा परिषदेतही भाजपची सत्ता आणा

लातुर दि.३(प्रतिनिधी):- केंद्र व राज्या प्रमाणे लातूर जिल्हा परिषदेतही भाजपची सत्ता असायला हवी. भाजप हा ग्रामीण भागाच्या विकासाला आणि सर्व सामान्य जनतेच्या हिताला प्राधान्य देणारा पक्ष आहे, त्यामुळे येत्या ७ तारखेला भाजप महायुतीचे उमेदवार मोठया मताधिक्याने विजयी करा असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज जाहीर सभांमधून बोलतांना केले. ना. पंकजाताई मुंडे



यांच्या आज लातूर जिल्हयातील किनगाव, जळकोट, जानवळ येथे जोरदार सभा झाल्या. या तीनही ठिकाणी सभेला तुफान गर्दी होती. सभेस संबोधित करताना पंकजाताई म्हणाल्या, अहमदपूर-चाकूर मतदारसंघ आणि परिसरावर लोकनेते मुंडे साहेबांनी खूप प्रेम केले आहे, मी सुध्दा या भागाच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. ग्रामविकास मंत्री असताना जलसंधारणाची कामे, ग्रामपंचायत

पान २ वर

# चंपावती महोत्सवाच्या रांगोळी स्पर्धेतून शिवरायांचा इतिहास जिवंत; ११५ शाळांमधील हजारो बालकलाकारांचा सहभाग

## बालकलाकारांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळवून देणे, हेच आमचे ध्येय-अनिलदादा

बीड दि.३(प्रतिनिधी):- बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रात मानबिंदू ठरलेली सांस्कृतिक चळवळ अनिल दादा जगताप फाउंडेशन बीड आणि शिवसेना बीड आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडक अंतर्गत सामूहिक रांगोळी स्पर्धा काल दिनांक ३ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून, ग्रामीण भागातील गाव-खेड्यांतून तब्बल ११५ शाळांमधील हजारो बालकलाकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या रांगोळी स्पर्धेसाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे गड-किल्ले हा विषय देण्यात आला होता. बालकलाकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे किल्ले विविध कल्पक स्वरूपात रांगोळीच्या माध्यमातून साकारले.

पान २ वर





CMYK